


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २५७ * नांदेड * रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# राज्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर

## नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश, मुदखेड-मुखेडला वगळले

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेत दुष्काळ जाहीर केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यात दुष्काळ, याचा अर्थ ७५ टक्के महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करण्यात आहे. या निर्णयामुळे दुष्काळाची दाहकता अनुभवत असलेल्या शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील ७५ टक्के भागात दुष्काळ जाहीर झाल्याने आता दुष्काळाच्या विविध उपाययोजना जाहीर होऊन त्यांची अंमलबजावणी केली जाणार आहे.



नियमानुसार, ट्रिगर १ लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये हा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. ट्रिगर १ म्हणजे पहिल्या टप्प्यातील निकष लागू असणाऱ्या २६५ तालुक्यांमध्ये कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यावर पंचनाम्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

शासकीय नियमांनुसार, 'ट्रिगर-१' लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये हा दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. मान्सून कालावधीत ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेला असणे किंवा पावसाचा प्रदीर्घ खंड पडलेला असणे, ही दुष्काळ व्यवस्थापनातील पहिली शास्त्रीय धोक्याची सूचना म्हणजेच 'ट्रिगर-१' मानली जाते.

### तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश

राज्यातील दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमध्ये कोरडा दुष्काळ जाहीर झाल्यानंतर शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी विविध सवलती व उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, कर्जवसुलीला स्थगिती, कृषीपंपांच्या वीजबिलात सवलत, जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था आणि रोजगार हमी योजनेअंतर्गत अधिक कामे सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. तसेच पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून मदत प्रक्रिया गतीमान करण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

### ही चक्क शेतकऱ्यांची फसवणूक –वडेट्टीवार

राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. सरकारने सरसकट मदतीचे आश्वासन दिले होते, मात्र तसे केले नाही. सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे, असा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, या परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक तसेच पशुधनाला दिलासा देणाऱ्या १२ उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांचा समावेश असून, या तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीबाबत तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार व कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी नुकताच नांदेड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली होती. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. तसेच पालकमंत्री अतुल सावे यांनीही जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

जून महिन्यापासून आतापर्यंतच्या कालावधीतील पर्जन्यमानातील तूट व अन्य घटकांमुळे प्रभावित झालेल्या नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलूर, किनवट, हिमायतनगर, माहूर, धर्माबाद, उमरी, अर्धापूर आणि नायगाव या १४ तालुक्यांमध्ये दुष्काळ व्यवस्थापन संहितेतील 'ट्रिगर-१ (प्रथम कळ)' अनुषंगाने पंचनामे करण्यात येणार आहेत.

दुष्काळग्रस्त भागात विशेष बाब म्हणून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात येणार आहेत. यामध्ये जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू वीजबिलात सूट यांचा समावेश आहे. ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचे वीजबिल यापूर्वीच माफ करण्यात आले असून, त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या पंपांना सदर सवलत लागू राहणार आहे. या उपाययोजनांमुळे दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करणाऱ्या नागरिकांना, शेतकरी व शेतमजुरांना तसेच पशुधनाला आवश्यक दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

## दुसऱ्या दिवशी सायंकाळपर्यंत विसर्जनाच्या मिरवणुका

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबई, पुण्यासह भारतात अनेक ठिकाणी दुसऱ्या दिवशी म्हणजेच शनिवारी सायंकाळपर्यंत गणरायाला निरोप देण्यात आला. यावेळी सायंकाळपर्यंत मिरवणुका पहावयास मिळाल्या.

मिरवणुकींमध्ये मुंबईसह उपनगरांमधून लाखो भाविक सहभागी झाले होते. शनिवारी २६ सप्टेंबर संध्याकाळी ६ वाजेपर्यंत ३६२६८ एकूण गणपती मुर्तींचे विसर्जन करण्यात आले. यामध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील ७०५१ गणेश मुर्तींचे, २८६५७ घरगुती गणेश मुर्तींचे आणि ५६० गौरीच्या मुर्तींचे विसर्जन करण्यात आले.

## माहूर तालुक्यात डीजे वाजविल्याने ५ गणेश मंडळांवर गुन्हे दाखल; १ कोटी ३७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**माहूर (प्रतिनिधी)–** माहूर तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या मौजे लखमापूर येथे गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान बंदी असतानाही कर्णकर्कश आवाजात डीजे वाजवल्याप्रकरणी पोलीस प्रशासनाने कडक कारवाई केली आहे. याप्रकरणी लखमापूर येथील ५ गणेश मंडळांचे पदाधिकारी व सदस्यांवर माहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, डीजे सिस्टीमसह ४ वाहने असा एकूण १ कोटी ३७ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन लखमापूर बीटचे पोलीस अंमलदार संदीप पुंडलिकराव गोपनवाड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, २४ सप्टेंबर रोजी लखमापूर बीटमधील लांजी, शेकापूर आणि लखमापूर येथे गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. लखमापूर तांडा येथील विसर्जन मिरवणुकीत २ परवानाधारक आणि ३ विनापरवानाधारक अशी एकूण ५ गणेश मंडळे सहभागी झाली होती.

या मंडळांनी जिल्हाधिकारी नांदेड यांच्या प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन करून बंदी असलेली डॉल्बी सिस्टीम अत्यंत उच्च व कर्णकर्कश आवाजात वाजवली, ज्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास व जीवितास धोका निर्माण झाला. तसेच पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी दिलेल्या लेखी व तोंडी सूचनांकडे दुर्लक्ष करून विसर्जन मिरवणूक वेळेत न संपवता विनाकारण लांबवण्यात आली.

महाराणी गणेश मंडळ, साई श्रद्धा गणेश मंडळ, गराशा गणेश मंडळ, भाया गणेश मंडळ, कन्हैया गणेश मंडळ या गणेश मंडळांच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व कोषाध्यक्षांवर कारवाई करण्यात आली आहे.

यासह चार आयचर वाहन व चार डीजे सिस्टीम जप्त करण्यात आले आहेत. याची किंमत जवळपास १ कोटी ३७ लाख रूपये आहे.

पोलीस तपास सुरू पोलीस अंमलदार संदीप गोपनवाड यांच्या फिर्यादीवरून पोलीस अंमलदार पुष्पा पुसनाके यांनी गुन्हा नोंदवला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे व पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके पुढील तपास करत आहेत.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून लोहा तालुक्यातील दुष्काळसदृश्य भागाची पाहणी

### सरकार शेतकऱ्यांच्या सर्वोतोपरी मदतीसाठी खंबीर; उपमुख्यमंत्र्यांचे आश्वासन



**लोहा (प्रतिनिधी)–** पावसाने मारलेल्या ओढीमुळे राज्याच्या बहुतांश भागात गंभीर दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. आम्ही थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी करत आहोत. पाणी, पशुधन, चारा आणि शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण या सर्वांसाठी राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी लोहा येथे व्यक्त केला.

शनिवारी (२६ सप्टेंबर) नांदेड जिल्ह्याच्या दुष्काळ व पीक पाहणी दौऱ्यावर आलेल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सकाळी साडे नऊ वाजता लोहा शहरातील कंधार रस्त्यावरील शेतकरी शिवाजी वाघमारे यांच्या शेतात जाऊन सोयाबीन पिकाची प्रत्यक्ष पाहणी केली.

प्रशासनाला तात्काळ पंचनाम्यांचे आदेश माध्यमांशी बोलताना उपमुख्यमंत्री म्हणाल्या, पावसाच्या खंडामुळे सर्वत्र गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. केवळ कागदावरील आकडेवारीवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष पाहणीनुसार अचूक पंचनामे करण्याचे स्पष्ट आदेश संपूर्ण प्रशासनाला देण्यात आले आहेत. प्रशासनाकडून अहवाल प्राप्त होताच सरकार तात्काळ ठोस निर्णय घेईल. ज्याचे जितके नुकसान झाले आहे, त्यानुसार मदत पुरवली जाईल.

या पीक पाहणी दौऱ्यावेळी उपमुख्यमंत्र्यांसोबत: सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पाटील पवार, जिल्हाध्यक्ष रावणगावकर, कार्याध्यक्ष माधव पावडे, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी नगराध्यक्ष केशवराव मुकदम, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, उपविभागीय अधिकारी नरवटे, लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर, कंधार तहसीलदार रामेश्वर गोरे, कृषी अधिकारी कासराळे, पाणीपुरवठा उपअभियंता बनसोडे, इंजि. कराड, जि. प. बांधकाम उपअभियंता शिवाजी राठोड. यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दौऱ्याची सुरुवात आमदार चिखलीकरांच्या मतदारसंघातून**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मराठवाडा दौऱ्याची सुरुवात लोहा-कंधार या आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मतदारसंघातून झाली. लोहा येथील पाहणीनंतर त्यांनी सोनखेड येथे थांबून पिकांची पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यानंतर त्या गंगाखेड तालुक्यातील मरडस गावाकडे रवाना झाल्या.

**स्व. अजितदादांच्या आठवणीने वातावरण भावुक**

माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांचा हा पहिलाच नांदेड जिल्हा दौरा होता. पाहणीदरम्यान उपस्थित शेतकऱ्यांनी स्व. अजितदादांच्या आठवणी जागवल्यामुळे काही काळ वातावरण भावुक झाले होते. अजितदादांप्रमाणेच मीसुद्धा खंबीरपणे तुमच्या पाठीशी उभी राहीन, असा दिलासा या वेळी सुनेत्रा पवार यांनी शेतकऱ्यांना दिला.

## मुदखेड तालुका दुष्काळातून वगळल्याने काँग्रेसचे आंदोलन; जीआरची होळी करत शासनाचा निषेध

### मुदखेड तालुका तात्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी

**मुदखेड (प्रतिनिधी)–** यावर्षी तालुक्यात अत्यल्प पाऊस झाल्याने खरीप हंगामातील पिके पूर्णपणे करपून गेली आहेत. अशी गंभीर परिस्थिती असतानाही शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीतून मुदखेड तालुक्याला वगळल्यामुळे काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. या अन्यायाविरोधात काँग्रेसच्या वतीने शासनाचा तीव्र निषेध नोंदवत जीआरची होळी करण्यात आली.




नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांपैकी १४ तालुक्यांचा समावेश दुष्काळग्रस्त यादीत करण्यात आला आहे. जिल्ह्यात 'ट्रिगर १' चा निकष ग्राह्य धरून ही घोषणा करण्यात आली असली, तर पावसाची तूट आणि खंडाच्या निकषाचे कारण देत मुदखेड व अन्य एक तालुका या यादीतून वगळण्यात आला आहे.

या निर्णयाच्या विरोधात भोकर विधानसभा काँग्रेसचे नेते तथा जिल्हा उपाध्यक्ष पप्पू पाटील कोंडेकर आणि काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी शहरातील उमरी चौकात आंदोलन करण्यात आले. या वेळी कार्यकर्त्यांनी सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणाचा जाहीर निषेध करत जोरदार घोषणाबाजी केली आणि शासन निर्णयाची (जीआर) होळी केली.

आंदोलनादरम्यान बोलताना काँग्रेस नेत्यांनी सांगितले की, पावसाअभावी शेतातील पिके जळून खाक झाली असताना मुदखेड तालुक्याला दुष्काळाच्या यादीतून वगळणे ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा आहे. प्रशासनाने तात्काळ प्रत्यक्ष पाहणी व पंचनामे करून मुदखेड तालुक्याचा समावेश दुष्काळग्रस्त यादीत करावा; अन्यथा सत्ताधारी लोकप्रतिनिधींना तालुक्यात फिरू दिले जाणार नाही, असा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला.

या आंदोलनात काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष पप्पू पाटील कोंडेकर, तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, जिल्हा सरचिटणीस गिरीश कोतवार, जिल्हा उपाध्यक्ष दादाराव पाटील पुयड, सेवादल तालुकाध्यक्ष गंगाधर पाटील, शिवसेना (पान ५ वर...)




## २४ वर्षांपासून गुलालमुक्त मिरवणुकीचा आदर्श; औशातील सर्व २८ मंडळांचा सन्मान



**लातूर (प्रतिनिधी)–** लातूर जिल्ह्यातल्या औसा शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांनी गुलाल मुक्त विसर्जन मिरवणुकीचा आदर्श गेल्या २४ वर्षांपासून जपला आहे. शहरातील सर्व २८ गणेश मंडळे सन २००३ पासून मिरवणुकी दरम्यान गुलालाऐवजी फुलांची उधळण करत असतात. या २८ गणेश मंडळांचा डीआयजी शहाजी उमाप यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

औसा शहरातील धार्मिक सहिष्णुता व सामाजिक सलोखा कायम राहावा या हेतूने, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी, ते औसा उपविभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी म्हणून कार्यरत असताना, सन २००३ पासून गणेशोत्सव मिरवणुकीदरम्यान गुलालाऐवजी फुलांच्या पाकळ्यांची उधळण करण्याचा अनोखा उपक्रम सुरू केला होता. तेव्हापासून शहरात गणेशोत्सव साजरा करणाऱ्या सर्व मंडळांनी ही परंपरा पाळली आहे. गेल्या २४ वर्षांत या मंडळांनी मिरवणुकी दरम्यान गुलालाची उधळण केलेली नाही. त्याऐवजी, पुष्पवृष्टी करून मिरवणुक संपन्न करण्यात येते. एखाद्या शहरातील सर्वच गणेश मंडळांनी गुलाल मुक्त मिरवणुकीच्या उपक्रमाचे सतत २४ (पान ५ वर...)

### आदर्श गणेश मंडळं : उमाप यांनी घालून दिलेला पायंडा अन् त्यांच्याच हस्ते सन्मान!

२४ वर्षांपूर्वी लातूर जिल्ह्यातील औसा येथे उपविभागीय पोलिस अधिकारी पदाचा पदभार असणारे शहाजी उमाप यांनी गुलाल मुक्त गणेश विसर्जन मिरवणुकीचा पायंडा सुरू केला होता. योगायोगाने आता ते याच परिसराचा समावेश असलेल्या नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक आहेत. आज तब्बल २४ वर्षांनी त्यांनीच घालून दिलेल्या या पायंड्याबद्दल औसा शहरातील सर्व २८ मंडळांचा त्यांच्याच हस्ते सन्मान करण्याचा योग जुळून आला. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्यासह तत्कालीन पोलीस निरीक्षक कालिदास सूर्यवंशी यांचीही उपस्थिती होती.

## शिंदे गटाच्या नगरसेविकेवर अनधिकृत बांधकामाचा ठपका; पद रद्द करण्याची ठाकरे सेनेची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ३, सांगवी प्रभागातील शिंदे गटाच्या नगरसेविका मिनल पाटील व त्यांचे पती गजानन पाटील यांनी महापालिका हद्दीत अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी व विमानतळ प्राधिकरणाच्या नियमांची पायमल्ली केल्याप्रकरणी त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आली आहे.

ठाकरे सेनेचे मुख्य महानगरप्रमुख प्रकाश मारावार, उपजिल्हाप्रमुख विजय बगाटे, नवज्योत सिंग गाडीवाले, प्रभाग क्रमांक ३ मधील उमेदवार बेगाबाई विश्वनाथराव कोकाटे, पिंटू पाटील कोकाटे व नितीन सरोदे यांनी मनपा आयुक्तांकडे याबाबत निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक ३ मधील सांगवी भागात विमानतळाच्या कंपाऊंड वॉललगत गजानन पाटील व संबंधित नगरसेविका यांनी कोणतीही परवानगी न घेता ग्राउंड फ्लोअर, फर्स्ट फ्लोअर व सेकंड फ्लोअर असे एकूण ७३१.७७१ चौ. मीटर अनधिकृत बांधकाम केले आहे. यामुळे महानगरपालिका अधिनियमाचा भंग झाला असून, विमानतळ प्राधिकरणाच्या हद्दीत नियमांचे उल्लंघन करून विमानतळाच्या सुरक्षेला धोका निर्माण केला आहे. (पान ५ वर...)

# एक होता सुभाष

**वऱ्हाडी कथा**



मुंबईचा अरबी खवळला होता. त्याच्या लाटा एकावर एक आदयत, ऊखयत फेस काळत होता. लाटा एकमेकीशी कुस्तमकुस्त्या खेयत होत्या. काठावर येवून रेतीत ईरघयत होत्या. गरम झालेली काठावरची रेती थन्ड अन् वली होत होती. चटईवाला चटया काखित दाबूनं फेरफटका मारत ईकळे तिकळे फिरत हिंडत होता. रेतीवर बसलेल्या लोकायले 'चटई मिलेगा दस रूपये घंटा, चटई ले लो दस रूपया घंटा... अस म्हनत होता. चहावाला कॅटली घेऊन गीरगावच्या चौपाटीवर च्यां ऽऽऽ च्यां ऽऽञऽ दो रूपया कटिंग

अस् बारीक अवाजात म्हनत कप कपावर आदयत वाजवत होता. बंबई की चौपाटी की थंन्डी थंन्डी कुल्फी लो जो गलेको थंन्डक पहुचाती है. अस महन्त लोखंडी डब्बा घेवूनं पीतयीची हातघंटी वाजवत फिरत होता. लाल,गुलाबी, पिव्वी ,पांढी, केसरी अन् तांबूस कांडी लहान लेकरायले आकर्षीत करत होती. गॅसचे फुगे ईकनारी बाई हटकून लेकराय जौळ येवूनं रंगबेरंगी फुगे दाखवत होती. धागा खाली ओहळून अखीन हात सैल करे. त कानातला मय काहाळनारा बाप्या ऊल्शी पेटी खांद्याले टांगून अरधाक फुट लंबी तार अन् काहीतरी ऊल्श्या बाटलीत लिक्विड घेवून फिरत म्हनत होता. कान का मैल निकालकर मिलेगा भैय्या. तीन रूपया का दो कान, तीन रूपया का दो कानं.अस म्हनत फिरत होता.

सुभाष समिंदरच्या काठावर बसून दूरचं क्षितिज पाह्यत होता. भरती ओहटीनं जीते असलेले शंख शिंपले काठावर येत होते. सुभाष रेतीत पाय रूतवून बसला होता. लहान पोरं कल्लाहल्ला करत समुद्राच्या लाटासोबत खेयत होते. तेयच्या चड्ड्या भिजत होत्या. थकले की थे रेतीचे घर बांधत होते. घर बांधताना रेती ऊकरल्यावर खाली पानी लागत होतं. विहिरीले पानी लागल्यागत थे हरकिजान पाह्यत होते. एक नव जोडप बिलगून बसल होतं. थे तेयच्याच तंद्रीत रममान होतं. सुभाष थे सारं शुन्य नजरेनं पाह्यत होता. समुद्र जसा सुभाष सोबत बोलत होता.

अल्लादी दिवस कलाले लागला होता. सूर्य समुद्रात बुळून राह्यला की काय लोकायले वाटत होतं. केशरी रंगाची चादर पसरवत सूर्य अस्ताले गेला. समुद्र केसरी झाला होता. रसत्यावर वाहनाची वर्दळ वाह–ाळली होती.सुभाष एका विच–ारात गुतला होता. मुंबईत येवून आपन एकट झालो. गावात किती ओयखी पायखी घरामधून बाहेर निघ–ालो की रामराम करत हात वरच राह्याचा. लंगोटी यार भेटाचे. तेयच्या सोबत फाट्यावरल्या टपरीवर चा पेनं, बिळी फुकनं, दंगामस्ती करनं. मायच्या हातची गरम ागरम चुलीवरची भाकर मटन मासोया खानं. बापाच्या रूबाबाखाली जगनं. भूलीचं थे मनमोहक हासनं.हिवायात हुळ्ळा, ऊंब्या, हुया, बोरं, ऊस खानं. आंगनात बाजी–वर वाकय टाकून झाळावरच्या पाखरायची किलकिल आयकत निचंत झोपन. रेडीओ वरच्या बातम्या, किर्केट समालोचन आयकनं. सुभाष जुन्या गोष्टी आठवत होता. सुभाष अखिनच भूतकाळात शिरला. पंधराक वरषाचा असन तव्हा सुभाष. एका रोजी सुभाषची माय वावरात गेली. तिन सुभाषसाठी दोन भाकरी दवळीत ठेवल्या अन् गंजूलीत हलक्या मटनाची तर्रीबाज भाजी ठुवून थे वावरात निंदाले गेली होती. गावातली कबरी कुतरी दाराच्या फटीतून आंग चोरून घरात शिरली अन् गंजूली ऊबळून तीनं मटन खाल्ल, दवळीतल्या दोही भाकरी सुंवा केल्या अन् कापसाच्या गंजीवर जावूनं निचंत निझली. सुभाष शाळेतून घरी आला. गंज पाह्यते त काय रिकामा. दवळीत चांदकही नाही अन् ऊंड्याची लक्ष्मीही नाही.

सुभाष ऊपाशीच पोट्यायसंग सुरपारंबी खेयाले गेला. दिवसभर खेवून थकून गेला. मंग दोयपारी पंचफुला भोयीनच्या घरी गेला. भट्टीच्या वर ठुयलेल्या रेवाच्या कळईतून पोंगें टरटर फुगून वर येत होते अन् पंचफुलाबाई फोळलेले पोंगे काहाळून पोत्यावर टाकत होती. तीन हेरलं सुभाषले भूक लागली म्हनूनसन्या. कारे पोंगे खात काय?

पंचफुलाबाई म्हनली.

सुभाषन होकारात्मक मान डोलवली.

घेनं मंग तासकीत तुले लागनं तेवळे खाय. पन् खानं झाल्यावर तुराट्या भट्टीत लोटू लाग.

पंचफुलाबाई बोल्ली.

हव आजी. अस म्हनून सुभाष सन्नावूनं भिळ्ळा. पोट भरूनं कचरकचर पोंगे खाल्ले अन् बोंदरी लावलेल्या घळ्ळीतलं पोटभर पानी पेला अन् तुराट्या भट्टीत सरकवू लागला. दिवस कल्ला. सयसंध्याकाय झाली. सुभाषची माय जिजाबाई घरी आली. दवळी गंज हुसकून पाह्यला. सारं सफाचक. सुभाष घरी आला.

कारे बाबू भाकर अन् मटन खाल्ल काय?

नाही व माय. दवळीत त कुटका नोता. अन् गंजूली त रिकामीच होती.

अव्व माय! कुतरं गीतर घुसल असनं घरात. चल तुले पटकन एक भाकर टाकूनं देतो अन् मंग तू जेवं.

अस् जीजा बोलूनं घोय खोसूनं भाकर कराले हातपाय न धुता बसली. तीनं कोपर घेतला. चायनीनं पिठ गायलं. पिठात चिमूटभर मिठ टाकलं. घळ–ाळीतलं पानी तांब्यात घेतलं. तावा चुलीवर ठुयला. चूलीच्या तोंडात तु–हाट्या खोसल्या. चिळी पेटोली. सौद्याचा कागद चुलीत टाकला. अंगारडब्बीन चूल भळकोली. ऊंडा चुरला. हातावर भाकर थापली. ताव्यावर पान्याचा शिपका मारला अन् रप्पकन भाकर ताव्यावर टाकली. भाकर दोही बाजूनं भाजली.आर बाहेर ओहळला. भाकर आरावर ऊभी केली. अन् भाकरीचा कुटका दवळीत टाकूनं भाकर तासकीत देल्ली. घे मा खाय भाकरं.

अस जिजाबाई बोलली.

सुभाषनं तासकी घेतली. तासकीत भाकर घेतली. भाकरीवर लाल चटनी घेतली. चटनीच आय केल. आयात पानी वतलं. अन् सुभाष म्हनते कसा.


मा हे भाकर म्हनजे तू अन् हे चटनी म्हनजे तुया माथ्यावरलं कुकू.

बापा बापा एखांद्या
लेखका सारखाच बोल्त तू.
मा मले लय मोठा लेखक बनाच हाय.
मंग शिका लागनं तुले. पुस्तक वाचा लागनं.
हव मा मी लेखकच बननं.

अस् सार सुभाषले समुद्राच्या काठावर बसून आठोत होतं. आज सुभाष ऊपाशी होता. पन् पटकन भाकर करून द्याले माय नोती.

**–सु. पुं. अढाऊकर**
अकोला
मो. ९७६९२०२५९७

# विज्ञानाच्या कल्पनांना माणसाच्या मनाचा स्पर्श देणारा संग्रह: 'थर्ड मॅन'




**पुस्तक परीक्षण**

**मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली
मो. ७०३८१२१०१२

विज्ञानकथा म्हटले की केवळ अंतराळ, परग्रह, रोबोट, भविष्यकालीन यंत्रे किंवा चमत्कारिक तंत्रज्ञान एवढ्यापुरती तिची व्याप्ती मर्यादित राहत नाही. विज्ञानाच्या प्रगतीमुळे माणसाचे आयुष्य, त्याचे नातेसंबंध, नैतिकता, भीती, महत्त्वाकांक्षा आणि अस्तित्व यांच्यात कोणते बदल घडू शकतात, हा प्रश्नही विज्ञानकथेला तितकाच महत्त्वाचा ठरतो. डॉ. संजय ढोले यांच्या 'थर्ड मॅन' या संग्रहाचे वैशिष्ट्य याच ठिकाणी जाणवते. या संग्रहात विज्ञान ही केवळ पार्श्वभूमी नाही; अनेक कथांमध्ये विज्ञानच कथानकाला पुढे नेणारे प्रमुख साधन बनते. प्रकाशकाच्या माहितीनुसार संग्रहातील कथा भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, किरणशास्त्र आणि विविध आंतरशाखीय विज्ञानविषयांशी जोडलेल्या आहेत. 'थर्ड मॅन', 'उपरा', 'मोकळं अवकाश', 'अंधारातील डोह', 'ट्रीटमेंट', 'नि:पात', 'मागोवा' आणि 'दरड' या कथांचा स्वतंत्रपणे उल्लेखही प्रकाशकाने केला आहे.

**भविष्याचा वेध घेणारी 'थर्ड मॅन'**

संग्रहाचे शीर्षक ज्या कथेला दिले आहे, ती कथा भविष्यकालीन विज्ञानाच्या शक्यतांकडे पाहणारी आहे. विज्ञानाच्या प्रगतीबरोबर माणूस स्वतःच्या अस्तित्वाच्या सीमा कशा बदलू शकतो, या प्रकारचे प्रश्न अशा कथांमधून पुढे येतात. या प्रकारच्या लेखनात केवळ 'काय होईल?' हा प्रश्न पुरेसा नसतो. 'ते झाल्यावर माणूस काय करेल?' आणि 'त्या बदलाचा मानवी जीवनावर परिणाम काय होईल?' हे प्रश्न अधिक महत्त्वाचे ठरतात. ढोले यांच्या विज्ञानकथनात ही मानवी बाजू जाणवते. त्यामुळे कथा केवळ वैज्ञानिक कल्पनांचे प्रदर्शन न राहता कथानकाचा भाग बनतात.

**'अंधारातील डोह' : विज्ञान आणि मानवी उत्कंठेचा संगम**

संग्रहातील 'अंधारातील डोह' ही कथा विशेष लक्षवेधी ठरते. या कथेच्या पानांवर वैज्ञानिक संशोधन, प्रयोग, डॉक्टर, संशोधक आणि मानवी जिज्ञासा यांचा सलग पट दिसतो. कथा वैद्यकीय विज्ञानाच्या क्षेत्रातील शक्यता आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न यांची सांगड घालते. या कथेत वैज्ञानिक तपशील कथेला जड करून टाकत नाहीत, हे तिचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. संवादांच्या माध्यमातून माहिती पुढे सरकते. त्यामुळे वाचकाला विज्ञान समजून घेण्याची संधी मिळते आणि त्याच वेळी पुढे काय घडणार, याची उत्सुकताही टिकून राहते. विज्ञानकथा लिहिताना 'माहिती' आणि 'कथा' यांचा समतोल राखणे अवघड असते; ढोले यांचा प्रयत्न या समतोलाकडे आहे.

**अंतराळकथा : 'उपरा' आणि 'मोकळं अवकाश'**

'उपरा' आणि 'मोकळं अवकाश' या कथा अंतराळविषयक आहेत. अंतराळ हा विज्ञानकथेचा लोकप्रिय विषय असला तरी मराठी लेखनात त्याचा वापर करताना स्थानिक भाषेतील कथानक, व्यक्तिरेखा आणि भावविश्व यांची सांगड घालणे आवश्यक असते. ढोले यांच्या लेखनात वैज्ञानिक कल्पना आणि मानवी अनुभव यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न दिसतो. विशेषतः भारतीय वैज्ञानिक, संशोधक, अंतराळमोहीम आणि भारतीय संदर्भ यांचा वापर कथेला आपलेपणा देतो. त्यामुळे कथा परदेशी विज्ञानपटासारखी न वाटता मराठी वाचकांच्या अनुभवविश्वाशी जोडली जाते.

**'दरड' : तंत्रज्ञानाचे कथानक**

'दरड' ही कथा तंत्रज्ञानाशी संबंधित आहे. येथे लेखकाने तंत्रज्ञानाचा वापर केवळ आकर्षणासाठी न करता त्यातून मानवी परिस्थिती आणि संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. हीच ढोले यांच्या लेखनाची एक महत्त्वाची बाजू आहेयंत्र महत्त्वाचे असले तरी यंत्रापेक्षा त्याचा वापर करणारा माणूस अधिक महत्त्वाचा ठरतो. तंत्रज्ञान माणसाच्या हातात गेले की ते वरदान ठरू शकते; त्याच वेळी त्याचा गैरवापरही होऊ शकतो. विज्ञानकथेची खरी ताकद याच द्वंद्वातून निर्माण होते.

**जनुक, वैद्यकीय विज्ञान आणि मानवी अस्तित्व**

'नि:पात' आणि 'मागोवा' या कथा मानवी जनुकाशी संबंधित आहेत. तर 'अंधारातील डोह' आणि 'ट्रीटमेंट' या वैद्यकीय विज्ञानाशी निगडित आहेत. या कथांमुळे संग्रहाची व्याप्ती लक्षात येते. लेखक एका वैज्ञानिक विषयाला धरून बसत नाही. अंतराळापासून वैद्यकीय विज्ञानापर्यंत आणि जनुकशास्त्रापासून तंत्रज्ञानापर्यंत विविध शाखांमधील संकल्पना कथानकात आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. यामुळे संग्रहात एकसुरीपणा येत नाही. प्रत्येक कथा विज्ञानाकडे वेगळ्या खिडकीतून पाहते.

**कथनशैली : माहितीपेक्षा कथेला प्राधान्य**

ढोले यांच्या कथांची एक महत्त्वाची जमेची बाजू म्हणजे वैज्ञानिक संकल्पना संवाद, प्रसंग आणि व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मांडण्याची पद्धत. विज्ञानकथेत दोन टोकांचे धोके असतात एक म्हणजे विज्ञान समजावून सांगताना कथा नष्ट होणे. आणि दुसरे म्हणजे कथा रंगवताना वैज्ञानिक आधार कमकुवत होणे. 'थर्ड मॅन'मध्ये लेखक या दोन्ही टोकांमध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न करतात. प्रस्तावनेत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय सोनवणी यांनीदेखील डॉ. ढोले यांच्या कथांमध्ये विज्ञानाच्या मध्यवर्ती कल्पना, सैद्धान्तिक व प्रायोगिक संकल्पना आणि भविष्यकालीन विज्ञानाचा वेध असल्याचे नमूद केले आहे.

**व्यक्तिरेखा: वैज्ञानिक असले तरी माणूसपण केंद्रस्थानी**

संग्रहातील वैज्ञानिक पात्रे केवळ प्रयोगशाळेत काम करणारी 'शास्त्रज्ञ पात्रे' म्हणून येत नाहीत. त्यांच्या महत्त्वाकांक्षा, चिंता, संशोधनाची धडपड, निर्णय आणि भावनिक प्रतिक्रिया यांना कथेत स्थान मिळते. यामुळे विज्ञानाला मानवी चेहरा प्राप्त होतो. ही बाब विशेष महत्त्वाची आहे. कारण विज्ञान स्वतः चांगले किंवा वाईट नसते; त्याचा उपयोग कोण आणि कशासाठी करतो, यावर त्याचे परिणाम ठरतात. ढोले यांच्या अनेक कथांमध्ये हा अंतःप्रवाह जाणवतो. या कथांमधील भाषा प्रामुख्याने प्रवाही, संवादप्रधान आणि सरळ आहे. वैज्ञानिक संज्ञा येतात; परंतु त्या कथानकापासून पूर्णपणे वेगळ्या उभ्या राहत नाहीत. संवादांमुळे वाचनाचा वेग टिकतो. काही ठिकाणी वैज्ञानिक माहिती आणि तपशील कथानकापेक्षा अधिक विस्तार घेतात. त्यामुळे एखाद्या प्रसंगाचा कथात्मक वेग किंचित मंदावतो. विज्ञानकथेत हा धोका स्वाभाविक आहे. काही ठिकाणी वैज्ञानिक संकल्पना आणखी संक्षिप्त आणि प्रसंगाधारित केल्या असत्या, तर कथांची परिणामकारकता वाढली असती, असे परीक्षणात्मक निरीक्षण नोंदवता येते.

**संग्रहाची बलस्थाने**

१. विषयवैविध्य : अंतराळ, भविष्यकालीन विज्ञान, वैद्यकीय विज्ञान, जनुकशास्त्र आणि तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांचा समावेश. २. विज्ञान आणि कथा यांची सांगड :

वैज्ञानिक माहिती स्वतंत्र लेखासारखी न देता ती कथानकात गुंफण्याचा प्रयत्न. ३. मराठी संदर्भ :भारतीय वैज्ञानिक आणि भारतीय सामाजिक संदर्भामुळे कथांना स्थानिक स्पर्श मिळतो. ४. कुतूहल निर्माण करण्याची क्षमता : रहस्य, प्रयोग, वैज्ञानिक शोध आणि अनपेक्षित वळणे यामुळे वाचकाला पुढे वाचण्याची प्रेरणा मिळते. ५. विज्ञानाकडे सकारात्मक दृष्टी : विज्ञान म्हणजे केवळ चमत्कार नसून प्रश्न विचारण्याची, शोध घेण्याची आणि समस्यांकडे तर्काने पाहण्याची पद्धत आहे, हा दृष्टिकोन संग्रहातून अधोरेखित होतो.

'थर्ड मॅन' हा केवळ विज्ञानाची माहिती देणारा कथासंग्रह नाही; तो विज्ञानाच्या शक्यतांमधून माणसाच्या भवितव्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करणारा संग्रह आहे. डॉ. संजय ढोले यांना विज्ञानकथेची रंजकता आणि वैज्ञानिक संकल्पनांची शिस्त यांचा मेळ घालण्याची जाण आहे. अंतराळ, वैद्यकीय विज्ञान, जनुकशास्त्र, तंत्रज्ञान आणि भविष्यकालीन विज्ञान या विविध क्षेत्रांमधून ते वाचकाला वेगवेगळ्या प्रश्नां–समोर उभे करतात. प्रकाशकाच्या वर्णनातही या विविध वैज्ञानिक क्षेत्रांचा स्पष्ट उल्लेख आहे. या संग्रहाचे खरे वैशिष्ट्य असे की 'विज्ञान काय करू शकते?' या प्रश्नाबरोबरच 'विज्ञानामुळे माणसाचे काय होईल?' हा प्रश्न तो वाचकाच्या मनात ठेवतो. म्हणूनच थर्ड मॅनकडे केवळ विज्ञानकथांचा संग्रह म्हणून नव्हे, तर मराठी विज्ञानकथेच्या वर्तमान प्रवाहातील विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानवी मूल्ये यांना एकत्र आणणारा प्रयत्न म्हणून पाहता येते.

**पुस्तक : थर्ड मॅन**
**लेखक : डॉ. संजय ढोले**
**प्रकार : विज्ञानकथासंग्रह**
**प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस**
**किंमत : २४०**

## प्रेमास सरावलेल्या हृदयाला...

प्रेमास सरावलेल्या हृदयाला,
प्रेमाचा दुष्काळ सहन होत नाही,
हवा असतो पाऊस प्रेमाचा त्याला,
झळ तिरस्काराच्या उन्हाची सहन होत नाही.
अनुभवलेले असतात हृदयाने,
आपलेपणाचे कित्येक पावसाळे,
उन्ह परकेपणाचे त्याला, सहन
करता येत नाही.
तहान पाण्याची भागेल एकदा,
पण तहान प्रेमाची भागवता येत नाही,
हृदयाला प्रेमाचा रक्तपुरवठा, सतत व्हायला हवा,
सलाईन तिरस्कारची, हृदयाला सहन होत नाही.
सवय सुटून गेली आता,
माणसाची माणसावर प्रेम करण्याची,
हृदयाला कितीही समजून सांगितले हे,
तरी त्याचा विश्वास बसत नाही.
प्रेमास सरावलेल्या हृदयाला,
प्रेमाचा दुष्काळ सहन होत नाही.

**अमित शिंदे.**
रोहिपिंपळगाव,
ता. मुदखेड, जि. नांदेड
मो. ९७६७८५१०४६

## आईची माया...

मान प्रतिष्ठा मिळेल तात्पुरता,
पैसा कमवाल तात्पुरता,
वा कीर्ती चढवाल हिमालयासारखी ,
पण मिळणार नाही, माया आई सारखी
जीवनभर त्रास घेईल, पण ते आपल्यासाठी
हिच ती माया घडविते,
सर्वांना पंढरिराया हितासाठी...


**–ॲड. सचिन संभाजी मगर**
चाभरा, ता. अर्धापूर, जि. नांदेड
मो. ७५१७२७२२९३

## विरहावरील कविता

पानावल्या डोळ्यांतून,
ओघळते तुझीच कविता
हृदयातल्या हरेत घावावर,
कोरली तुझीच कविता
तू बोलायचीस जेव्हा,
मी पहायचो मुक्याने
ओठावर तेव्हा फुलायची,
तुझ्यावरील कविता
मी हसलो आनंदात,
तुला सुखात पाहून
मस्तकात माझ्या बहरते,
तुझ्यावरील कविता
येऊन जा जराशी,
एकटी स्वप्नात माझ्या
मज रात्र रात्र जागविते,
तुझ्यावरील कविता
गेलीस सोडून एकट्या,
थोडीशी स्तब्ध स्तब्ध
फुलते हळूच येथे,
तुझ्यावरील कविता
दोन शब्द तुझे,
दोन अश्रू माझे
एकटा मिळून लिहून मी
विरहावरील कविता.

**–राहुल जोंधळे**
जि. प. प्रा. शा. बळेगाव
ता. उमरी, जि. नांदेड
मो. ९८९००४९८५०

# पर्यटन जगासाठी सामाजिक, सांस्कृतिक, एकता आणि आर्थिक विकासाचा आधारस्तंभ



जागतिक संतुलन टिकविण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सर्वच देशांनी पर्यटनाला जास्त महत्त्व दिले पाहिजे. जगातील देशांना आर्थिकस्थिती बळकट करण्यासाठी पर्यटनाला चालना देण्याची नितांत गरज आहे.पर्यटनाचे महत्व आणि लोकप्रियता पाहून संयुक्त राष्ट्रसंघाने १९८० पासून २७ सप्टेंबर विश्व पर्यटन दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. कारण संयुक्त राष्ट्र संघाने २७ सप्टेंबर १९७० ला विश्व पर्यटन संघटनेचे संविधान स्वीकारले होते. जीवनामध्ये आनंद मिळावा याकरिता पर्यटनस्थळांना भेट देणे गरजेचे असते.पर्यटन फक्त जीवनात खुशीच निर्माण करत नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक, रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावून बळकट करण्याचे काम करीत असते. आज अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनामुळे मजबूत झाल्याचे दिसून येते.

भारत पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी स्वर्ग तर विश्व शांतीचा दूत आहे. पर्यटन हे जागतिक प्रदूषण नियंत्रणाचे महत्वाचे काम करीत असते. भारतात २८ राज्ये व ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात आपल्याला मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे पहायला मिळतात. आजही लाखो विदेशी पर्यटक भारतात येतात व पर्यटनाचा आनंद घेताना दिसतात. पर्यटस्थळे देशाला सुशोभित करतात व देशाच्या विकासाला हातभार लावण्याचे व चालना देण्याचे काम पर्यटनाच्या माध्यमातून नेहमी होत असते. भारतात लाखोंच्या संख्येने विदेशी पर्यटक नेहमी येत असतात. कारण जगाच्या पाठीवर भारतातील पर्यटनस्थळे ऐतिहासिक, पुरातन, नामांकित आणि जागतिक वारसा मिळालेले सुशोभित स्थळे आहेत. यामुळे भारताला विदेशी चलन मोठ्या प्रमाणात प्राप्त होते. भारतातील पर्यटनामुळे विदेशी पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतातील पर्यटकसुध्दा अनेक रम्य ठिकानांणा भेट देऊन आपली उपस्थिती नोंदवीतात. पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार मिळावा या उद्देशाने देशातील प्रत्येक नागरिकांनी दरवर्षी १० पर्यटन स्थळांना भेट देऊन भारताचा सन्मान वाढवावा. भारतातील राजे–महाराजे यांचे साहित्य, किल्ले, काश्मिरसारखी पर्यटनस्थळे, देवी–देवतांची नामांकित स्थळे, ताजमहल, कुतुब–मिनार, बुध्दगयासारखी अनेक ऐतिहासिक स्थळे भारतात आहेत. जगात अनेक महत्वपूर्ण ठिकाणे आहेत. जगातील वाढत्या तापमानामुळे मोठमोठी ग्लेशिअर वितळत आहे आणि याचे जिवंत उदाहरण आपल्याला २६ ऑगस्ट २०२६ ला नेपाळमध्ये महाप्रलयाच्या रूपात दिसून आले. यामुळे पर्यटनावर, पर्यटकांवर आणि निसर्गावर विपरीत परिणाम होताना दिसतो

आज भारतातील व जगातील सर्वात मोठे पर्यटनस्थळ म्हणून गुजरातमधील नर्मदा नदीच्या काठावर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा स्टॅच्यु ऑफ युनिटी भव्य पुतळा उभारण्यात आला आहे. या व्यतिरिक्त भारतात इतकी पर्यटनस्थळे आहेत की त्यांची तुलना करणे कठीण आहे. भारतात गडकिल्ले, पुरातन भव्य मंदिरे, अजिंठा–वेरूळ सारख्या लेण्या, बौध्दगया, कुतुबमिनार, ताजमहाल इत्यादी अनेक हजारो ऐतिहासिक ठिकाणे पर्यटनाच्या बाबतीत प्रसिद्ध आहेत. आज जगाच्या दृष्टीकोणातून विचार केला तर संपूर्ण भारतच पर्यटन स्थळाचा केंद्रबिंदू आहे. भारतात पर्यटनस्थळी देव–दानव, ऋषी–मुनी, साधु–संत, वेषभूषा, पूजापद्धती, भारतीय संस्कृती, विविध भाषा, थोरमहात्म्यांचा, क्रांतिकारकांचा व विविध धर्मांचा इतिहास अशा अनेक वेगवेगळ्या पद्धती, मनोरंजनात्मक, साहित्य, पौराणिक कथा, इतिहास व संस्कृतीचे दर्शन भारतातील पर्यटन स्थळी पहायला मिळते व पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतात अनेक धर्माचे व पंथाचे लोक राहात असल्यामुळे याठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीची पर्यटनस्थळे भाषा सुध्दा पहायला मिळते. भारतातील खान–पानाच्या पध्दतीचा विदेशी पर्यटक मोठ्या आनंदाने स्वाद घेतात. भारतातील इतिहास आहे की एकट्या महाराष्ट्रात ३१७ गडकिल्ले आहेत यातील फक्त ९६ गडकिल्ले पर्यटनस्थळे आहेत.परंतु आजही २२१ गडकिल्ले पर्यटनाची व पर्यटकांची प्रतिक्षा करीत आहे. यावर महाराष्ट्र सरकारने विचार करून संपूर्ण गडकिल्ले हेरिटेज, लग्नसमारंभ, मनोरंजनात्मक कार्यक्रम याकरिता भाडे तत्वावर देऊ नये. यामुळे पर्यटनस्थळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. याला नाकारता येत नाही.

या दृष्टीकोनातून २७ सप्टेंबरला संपूर्ण जगाने संकल्प केला पाहिजे की पर्यटन हेच जनतेला आनंद प्रदान करू शकते. विश्वातील देशांनी पर्यटनाकडे जातीने लक्ष दिले तर प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था सुदृढ आणि बळकट होण्यास मदत होईल. त्यामुळे प्रत्येक स्तरातून पर्यटनाला चालना मिळायलाच पाहिजे. पर्यटनामुळे सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक व आर्थिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात चालना मिळते. पर्यटनामुळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मित्रत्वाची भावना वाढते.जगात अनेक देशांमध्ये मोठ–मोठी पर्यटन स्थळे आहेत. सध्याच्या परिस्थितीत जे–जे देश युध्दामध्ये किंवा गृहयुद्धात जखडले आहेत त्या–त्या देशावर पर्यटनाच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित झालेला आहे. त्यामुळे पर्यटनाला चालना देण्यासाठी संपूर्ण देशांनी शांततेचा मार्ग अवलंबला पाहिजे. मानवजाती, जीवसृष्टी,वन्यप्राणी, पशुपक्षी,स्थल,जल,वायु यांना जीवीत ठेवण्याकरिता व प्रदुषणावर मात करण्यासाठी जगाने पर्यटनाला प्रथम स्थान देवून पर्यटकांचे आकर्षण वाढविण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याची गरज आहे. पर्यटन दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी पर्यटकांच्या हस्ते व सरकारच्या हस्ते मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करायला पाहिजे. यामुळे पर्यटकांमध्ये नवीन आशा–अपेक्षा, आकांक्षा, नवीदिशा निर्माण होईल.भारत सरकारने जागतिक पर्यटन दिवसांच्या निमित्ताने सरकारने, प्रशासनाने आणि सामाजिक संस्थांनी वृक्षलागवडीचा संकल्प घेतला पाहिजे.यामुळे पर्यटनात मोठ्या प्रमाणात भर पडल्याचे दिसून येईल.

**–रमेश कृष्णराव लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर वैरण व्यवस्थापनावर भर

## सायाळ येथे वैरण विकास योजनेची सीईओ महेश पाटील यांनी केली पाहणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी वैरण उपलब्धता कायम ठेवण्यासाठी प्रभावी नियोजन करण्याची गरज असून, उपलब्ध हिरवा व वाळलेला चारा तसेच कृषी पिकांचे अवशेष यांचा काटकसरीने व शास्त्रीय पद्धतीने वापर करण्यावर भर देण्याचे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी दिले.

लोहा तालुक्यातील सायाळ येथे पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या वैरण विकास योजनेची मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रगतीशील शेतकरी रत्नाकर ढगे यांच्या शेतास भेट देऊन योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या चारा लागवडीची पाहणी केली. तसेच त्यांच्या गोठ्यास भेट देऊन पशुधनाची पाहणी केली व दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी करण्यात आलेल्या वैरण व्यवस्थापनाची माहिती घेतली.



दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी वैरणीची उपलब्धता कमी होऊ नये, यासाठी उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य वापर करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कडबाकुट्टी यंत्राचा वापर करून वैरणीची बचत करणे, निकृष्ट चाऱ्यावर योग्य प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता वाढविणे, बांधावर नेपियर गवताची लागवड करणे तसेच पशुपालकांमध्ये चारा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

उपलब्ध हिरव्या चाऱ्याचे योग्य पद्धतीने संवर्धन करून भविष्यातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी मुरघास निर्मिती व वापराला प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. पशुपालक शेतकऱ्यांमध्ये मुरघास निर्मितीबाबत जनजागृती करून उपलब्ध हिरव्या चाऱ्याचे जास्तीत जास्त संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.

या पाहणीवेळी जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपआयुक्त डॉ. सखाराम खुणे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय कळसाईत, उपविभागीय अधिकारी विलास नरोटे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, सहाय्यक गटविकास अधिकारी सुनिता वानखेडे, कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब यांच्यासह पशुसंवर्धन, कृषी, महसूल, पाणीपुरवठा व इतर संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पालकमंत्री अतुल सावे यांचा नांदेड जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थिती व टंचाईग्रस्त भागाचा पाहणी दौरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुष्काळसदृश परिस्थिती व टंचाईग्रस्त भागाची पाहणी व समीक्षा करण्यासाठी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ६ वा. छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने नांदेडकडे प्रयाण करतील. सकाळी ९.३० वा. नांदेड जिल्ह्यात आगमन व जिल्ह्यातील हदगाव, भोकर, उमरी, नायगाव व नांदेड या तालुक्यातील दुष्काळसदृश परिस्थिती व टंचाईग्रस्त भागाची पाहणी व समीक्षा दौरा करतील. सोईनुसार नांदेड येथून छत्रपती संभाजीनगरकडे वाहनाने प्रयाण करतील.

# कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांना ‘ग्लोबल ग्रीन लीडरशिप अवॉर्ड’

## शाश्वत विकास व पर्यावरण संवर्धनातील नेतृत्वाचा गौरव; विद्यापीठ परिवारात आनंदाचे वातावरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांना शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन आणि हरित उपक्रमांच्या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा ‘ग्लोबल ग्रीन लीडरशिप अवॉर्ड’ अमेरिकेतील न्यूयार्क येथे दि. २४ सप्टेंबर रोजी अमेरिकेतील सिनेट सदस्य गुस्ताहो रिव्हेरा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. या सन्मानामुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याला आणखी एक मानाचा गौरव प्राप्त झाला आहे.

कुलगुरू डॉ. चासकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली विद्यापीठाच्या विकास प्रक्रियेत पर्यावरणपूरक दृष्टिकोनाला विशेष महत्त्व देण्यात येत आहे. शाश्वत विकास, हरित परिसर, वृक्षसंवर्धन, पर्यावरण जागृती तसेच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय




जाणीव निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांना चालना देण्यात येत आहे. ‘विकासासोबत पर्यावरणाचे संरक्षण’ हा दृष्टिकोन विद्यापीठाच्या कार्यपद्धतीत अधोरेखित होत आहे.

या कार्याची दखल घेत कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांना मिळालेला ‘ग्लोबल ग्रीन लीडरशिप अवॉर्ड’ हा त्यांच्या नेतृत्वाचा आणि पर्यावरण संवर्धनाप्रती असलेल्या बांधिलकीचा गौरव मानला जात आहे.

या प्रतिष्ठेच्या पुरस्काराबद्दल कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांचे विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# नांदेड स्थानकावर ‘जनसंवाद’ कार्यक्रम उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)–** ‘स्वच्छता ही सेवा २०२६’ अंतर्गत हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर ‘जनसंवाद’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात प्रवासी, स्वयंसेवी संस्था, प्रवासी संघटना आणि रेल्वे उपभोक्ता समितीच्या माजी सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

यावेळी कामले यांनी स्वच्छता राखण्यासाठी प्रवाशांनी सहकार्य करावे आणि कचरापेटीचा वापर करावा, असे आवाहन केले. नांदेड विभागाकडून राबवण्यात येत असलेल्या स्वच्छता उपाययोजनांची माहितीही त्यांनी दिली.




कार्यक्रमादरम्यान प्रवाशांनी नांदेड स्थानक आणि सचखंड एक्सप्रेसमधील स्वच्छतेबाबत समाधान व्यक्त केले. Rail Madad तक्रारींमध्ये ४५% घट झाल्याबद्दलही कौतुक करण्यात आले.

प्रवाशांनी बेडरोलची योग्य विल्हेवाट, प्रसाधनगृहांची स्वच्छता, अनधिकृत प्रवासी आणि फेरीवाल्यांवर कारवाई तसेच कीटकनियंत्रण उपाययोजना मजबूत करण्यासारख्या सूचना मांडल्या. रेल्वे प्रशासनाने या सर्व सूचनांची नोंद घेत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उद्या नांदेड जिल्हा दौऱ्यावर

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे सोमवार, दि. २८ सप्टेंबर रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते दुष्काळग्रस्त भागातील पीक पाहणी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात दुष्काळजन्य परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. त्यानंतर कंधार तालुक्यातील शिराढोण येथे आयोजित महाआरोग्य शिबिरास उपस्थित राहणार आहेत.

महसूल मंत्री बावनकुळे हे दुपारी १२ वाजता हिंगोली येथून मोटारीने नांदेडकडे प्रयाण करतील. दुपारी २ वाजता नांदेड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागातील पीक पाहणी दौऱ्यास उपस्थित राहतील. त्यानंतर दुपारी ३ ते ४ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे दुष्काळजन्य परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीस उपस्थित राहतील. दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातून ते कंधार तालुक्यातील शिराढोण येथील कार्यक्रमस्थळाकडे प्रयाण करतील. दुपारी ४.३० वाजता प्रेरणास्थळ भीमाशंकर विद्यालय परिसर येथे कै. माधवराव पांडागळे यांच्या पूर्णाकृती पुतळा अनावरणानिमित्त आयोजित मोफत महाआरोग्य शिबीर कार्यक्रमास ते उपस्थित राहतील. सायंकाळी ५ वाजता कार्यक्रमस्थळावरून मोटारीने नांदेड विमानतळाकडे प्रयाण करून सायंकाळी ५.४५ वाजता नांदेड विमानतळावर आगमन होईल. त्यानंतर सायंकाळी ६.४५ वाजता विमानाने पुण्याकडे प्रयाण करतील.

# झुलेलाल गणेश मंडळाकडून पर्यावरणपुरक गणेश विसर्जन



**नांदेड (प्रतिनिधी) –**शहरात गणेशोत्सवाच्या उत्साहात विविध गणेश मंडळांकडून श्री गणरायाचे विसर्जन मोठ्या भक्तिभावाने आणि जल्लोषात करण्यात आले. मात्र यामध्ये झुलेलाल गणेश मंडळ, पूज्य सिंध पंचायत यांनी केलेले पर्यावरणपुरक विसर्जन विशेष ठरले.

या मंडळाने यंदा शाडू मातीची गणेशमूर्ती प्रतिष्ठापित केली होती. पर्यावरणाचे संरक्षण आणि जलप्रदूषण टाळण्याचा संदेश देण्यासाठी मंडळाने नदी, तलाव किंवा इतर जलस्रोतांमध्ये विसर्जन न करता स्वतःच्या कॉलनीतील उद्यानात विशेष हौद तयार करून त्यामध्ये श्री गणरायाचे विसर्जन केले.

या उपक्रमातून पर्यावरण वाचवा, जलप्रदूषण टाळा असा महत्त्वपूर्ण सामाजिक संदेश देण्यात आला. गणेश विसर्जन हा केवळ धार्मिक विधी न राहता पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याची संधी आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले. विशेष म्हणजे, विसर्जनानंतर हौदातील गणेशमूर्तीची माती वाया जाऊ न देता त्याच मातीचा उपयोग वृक्षारोपणासाठी करण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. झुलेलाल सिंधी गणेश मंडळाचे अध्यक्ष तनीश धनवानी यांच्या कुटुंबावर या मातीपासून रोपे लावण्याची तसेच त्या रोपांची नियमित देखभाल करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

ही जबाबदारी केवळ रोपे लावण्यापुरती मर्यादित नसून, ही रोपे मोठी होऊन वृक्ष बनेपर्यंत त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी संबंधित कुटुंब पार पाडणार आहे.

हा पर्यावरणपुरक उपक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश निहलानी, बंटी तुलसानी, राहुल गुलचंदानी, नितीन लालवानी, नंदू धनवानी आणि पियूष निहलानी यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजन, सहकार्य आणि मेहनतीमुळे हा अभिनव उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

# ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत गणेश विसर्जन शांततेत, गुलालाऐवजी पुष्प वृष्टी, ढोल ताशाचा गजर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** यावर्षी प्रथमच नांदेड दक्षिण भागातील व ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील शहरी व ग्रामीण भागासह नवीन नांदेड भागातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मूर्ती विसर्जन किवळा साठवण तलाव येथे मोठ्या मूर्ती रात्री उशिरापर्यंत जीवरक्षक दलासह क्रेनच्या सहाय्याने व पोलीस बंदोबस्तात मनपाच्या सहकार्याने शांततेत संपन्न झाले तर नावघाट, वसरणी, बसवेश्वर पुतळा, सिडको क्षेत्रीय कार्यालयासह अनेक ठिकाणी कृत्रिम तलाव निर्मिती करण्यात आली होती. यावेळी श्रीगणेश भक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत शहरी व ग्रामीण भागात गणेश मूर्तींचे विसर्जन किवळा साठवण तलाव या ठिकाणी क्रेनच्या सहाय्याने तर वसरणी नावघाट येथे श्री मूर्ती संकलन शांततेत संपन्न झाले. यावेळी शहरी



भागात मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी दिलेल्या आदेशानुसार नदीपात्रात गणेश मूर्ती विसर्जन न करता मनपा कर्मचारी नियुक्त घाटावरील मूर्ती संकलन केंद्रात अनेकांनी सहकार्य केले तर जिल्हा अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले यांनी भेट देऊन पाहणी केली, तर सिडको परिसरातील मुख्य मिरवणुकीत सजीव देखावा जय महाराष्ट्र व व्यंकटेश गणेश मंडळ यांनी खंडोबा व माळसा यांच्या जय मल्हार लग्नाचा सजीव देखावा सोहळा व गुन्हेगारी प्रवृत्ती रोखण्यासाठी जीवन चारित्र्यावर आधारित देखावा दाखविण्यात आला.

यावेळी दुतर्फा गर्दी असलेल्या भाविक भक्तांची मने जिंकली, तर हडको परिसरातील ओंकार गणेश, शिव गणेश मंडळाच्या सर्वात उंच असलेल्या मूर्तीने लक्ष वेधून घेतले होते तर प्रथमच विना डिझे, ढोल ताशा व फुलांच्या पुष्पवृष्टीत गणरायाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. रात्री उशिरापर्यंत किवळा साठवण येथे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मूर्तीचे विसर्जन झाले.

ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत शहरी व ग्रामीण भागात ८२ परवानगी असलेले तर जवळपास १२५ विनापरवाना शहरी ग्रामीण भागात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पदाधिकाऱ्यांनी रितसर परवानगी घेतली होती. ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत दोन ठिकाणी गणेशोत्सव विसर्जन करण्यासाठी परवानगी देण्यात आली होती. नावघाट वसरणी येथे मूर्ती संकलन तर प्रथमच पाणीसाठा उपलब्ध नसल्याने किंवळा साठवण तलाव येथे नांदेड शहरातील मोठ्या गणेश मूर्तीचे विसर्जन रात्री उशिरापर्यंत शांततेत झाले.

## मोहम्मद हकीम मोहम्मद गौस यांची शिवसेना भोकर विधानसभा उपप्रमुखपदी नियुक्ती

**मुदखेड (प्रतिनिधी)–** मुदखेड येथील शिवसेना अल्पसंख्याक विभागाच्या संघटनात्मक



विस्ताराला गती देण्यासाठी मोहम्मद हकीम मोहम्मद गौस यांची शिवसेना भोकर विधानसभा उपप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. शिवसेनेचे उपनेते, मंत्री दर्जा माजी खासदार तथा विधान परिषदेचे गटनेते आमदार हेमंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार सईद भैया खान यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आली. शिवसेना भोकर विधानसभा नेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक इंजि. विश्वंभर पवार, पत्रकार आयुब पठाण यांच्या उपस्थितीत तसेच शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे नांदेड जिल्हाप्रमुख अनवर अहेमद यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

# वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी इंजि. प्रवीण जाधव पिंपळदरीकर यांची फेरनिवड

**नांदेड (प्रतिनिधी)–** वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेच्या नांदेड जिल्हाध्यक्षपदी इंजि. प्रवीण जाधव पिंपळदरीकर यांची फेरनिवड करण्यात आली. दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी नांदेड येथील यशवंतराव चव्हाण मराठा मुलांच्या वसतिगृहावर आयोजित बैठकीत परिषदेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. दिलीप चौधरी यांच्या हस्ते इंजि. प्रवीण जाधव यांना निवडीचे अधिकृत पत्र प्रदान करण्यात आले.



विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संघटनात्मक प्रश्नांसाठी कार्यरत असलेल्या वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यात संघटन अधिक सक्षम करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचे यावेळी इंजि. प्रवीण जाधव यांनी सांगितले.

या निवडीप्रसंगी इंजि. शे. रा. पाटील, गडचिरोलीचे जिल्हाध्यक्ष लडके, जाधव, सोळंके, बालाजी कदम, व्ही. टी. शिंदे, पंडित कदम, सतीश जाधव, अंकुश कोल्हे यांच्यासह वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इंजि. प्रवीण जाधव यांच्या फेरनिवडीबद्दल उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## पीएसआय सुधाकर कांबळे यांना गौरव पुरस्कार जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण उद्देश न्यूज पेपर आणि गणेश मंडळ भेंडेगाव यांच्या



संयुक्त विद्यमाने क र्त व्य द क्ष अधिकारी व सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. याच उपक्रमांतर्गत इतवारा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुधाकर राजाराम कांबळे यांना उत्कृष्ट पोलीस सेवेबद्दल गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

पोलीस उपनिरीक्षक सुधाकर कांबळे यांनी नांदेड शहर वाहतूक विभागात नियोजनबद्ध आणि कौतुकास्पद कामगिरी बजावत आहेत. त्यांच्या तत्पर सेवेमुळे त्यांनी पोलीस प्रशासनात आणि नागरिकांमध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# स्वातंत्र्यवीर सावरकर प्रेमी मित्र मंडळ आयोजित १५ वे संमेलन भूतान येथे होणार

**नांदेड (प्रतिनिधी) –** स्वातंत्र्यवीर सावरकर प्रेमी मित्र मंडळ छत्रपती संभाजी नगर गेल्या ३० वर्षांपासून स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या संमेलनाचे आयोजन करीत आले आहे.

या अगोदर मंडळांनी छत्रपती संभाजीनगर, अंदमान, मॉरिशियस, श्रीलंका, लंडन, सिंगापूर, जपान, इंदोर, हम्पी, भगूर नाशिक, मेळघाट अशा अनेक ठिकाणी संमेलनाचे आयोजन केले होते. स्थानिक लोकांचा त्यामध्ये मोठा सहभाग राहातो. आपल्या भारताची संस्कृती, क्रांतिकारकाचे योगदान असे विषय या संमेलनाच्या माध्यमातून मांडल्या गेलेले आहेत.

१५ वे संमेलन भूतान येथील थिंपू या राजधानीत २ ऑक्टोंबर २०२६ रोजी आयोजन केले आहे. या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार सुधीर सेवेकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष माहिती व जनसंपर्क महाराष्ट्राचे माजी संचालक देवेंद्र भुजबळ, संमेलनाचे निमंत्रक म्हणून भाऊ सुरडकर, कार्याध्यक्ष स्नेहल पाठक या संमेलनामध्ये भूतान येथील राज परिवारातील तसेच भारतीय सैन्य दलातील काही मंडळी उपस्थित राहणार आहेत.

या सभेमध्ये अनेक मान्यवर आपले विचार मांडणार आहेत. सावरकरांच्या अनेक पैलूंवर जे लेख अनेक मान्यवरांनी लिहिलेले आहेत त्या स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा या ठिकाणी अनेक मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे. शैलजा देशपांडे यांचं अनादी मी, तसेच देवेंद्र भुजबळ यांच्या पुस्तकाचे प्रकाशन देखील याच ठिकाणी संपन्न होणार आहे. एका परिसत्रात ज्येष्ठ साहित्यिका प्रा. स्नेहल पाठक ह्या स्वातंत्र्यवीर सावरकर कुटुंबातील तीन अग्निशिखा विषय मांडणार आहेत. अस्मिता शिंगोटे ह्या स्वातंत्र्यवीर सावरकर मित्र मंडळ, पांढरकवडा या शाखेची वाटचाल. ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक वाकोडकर हे स्वातंत्र्यवीर सावरकरांची पत्रकारिता हा विषय मांडणार आहेत. प्रा. रवींद्र मगर यांच्या पुढाकाराने एका मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## पेरकेवार कुटुंबाच्या जगण्याला मिळाला आधार; शिलाई मशीनसह साहित्य सुपूर्द




**नरसीफाटा (प्रतिनिधी)–** पतीच्या निधनानंतर आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या नरसी येथील पेरकेवार कुटुंबाच्या मदतीला सामाजिक बांधिलकी जपत मदतीचे हात पुढे आले आहेत. नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती सय्यद रहीम सय्यद मीर यांनी रविवारी नरसी येथे दिवंगत सुभाष पेरकेवार यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन श्रीमती अनुराधा सुभाष पेरकेवार यांना शिलाई मशीन व इतर साधनसामग्री सुपूर्द केली. या मदतीमुळे कुटुंबाला स्वयंरोजगारातून आर्थिक हातभार मिळण्यास मदत होणार आहे.

नरसी येथील अल्पभूधारक शेतकरी असलेले सुभाष पेरकेवार यांनी काही महिन्यांपूर्वी आत्महत्या केली होती. पत्रकारितेच्या क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले होते. त्यांच्या निधनामुळे पेरकेवार कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले.

# उपवर्गीकरण निर्धार महाआंदोलनात सहभागी व्हावे –के. मूर्ती

**किनवट (प्रतिनिधी)–**अनुसूचित जातीतील आरक्षणाचा लाभ वंचित घटकांना मिळावा व मातंग समाजासह इतर वंचित जातींना सामाजिक न्याय मिळावा यासाठी अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी २९ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदान ते मंत्रालय दरम्यान उपवर्गीकरण निर्धार महाआंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या महाआंदोलनात मातंग समाज व सर्व लाभवंचित बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते तथा किनवटचे माजी नगराध्यक्ष के. मूर्ती यांनी केले आहे.

अनुसूचित जातीतील ५९ जातींना आरक्षणाचा योग्य लाभ मिळावा आणि सामाजिक समता प्रस्थापित व्हावी, यासाठी कॅ. डॉ. बाबासाहेब गोपले यांच्यासह अनेक समाजबांधव चार दशकांपासून संघर्ष करत आहेत. दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा अधिकार राज्य सरकारांना असल्याचा ऐतिहासिक निकाल दिला. पंजाब, हरियाणा, तेलंगणा, आंध्र प्रदेश, तमिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांनी उपवर्गीकरण करून निर्णय लागू केला आहे, परंतु महाराष्ट्रात अद्याप निर्णय झालेला नाही. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश अनंत बदर समितीने अभ्यासानंतर १६ मार्च २०२६ रोजी सरकारला अहवाल सादर केला आहे. या अहवालाच्या अभ्यासासाठी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची समिती नेमली गेली असली, तरी शासनाकडून निर्णयाला दिरंगाई होत असल्याने दि. २९ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते ५ यावेळेत आझाद मैदान, मुंबई येथे सकल मातंग समाजाच्यावतीने महाआंदोलन होणार असून, या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन के. मूर्ती यांनी केले आहे.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## आयफोन 18 प्रो सीरिजवर 25 टक्के सवलतीचे आमिष

# सायबर गुन्हेगारांच्या जाळे तर नाही?

**आयफोन १८ प्रो आणि आयफोन १८ प्रो मॅक्स खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर सावध राहण्याची गरज आहे. सायबर सुरक्षा क्षेत्रातील कंपनी कॅस्परस्कीने (Kaspersky) आयफोन खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांना गंभीर इशारा दिला आहे.**



आयफोनच्या मोठ्या किमतीचा फायदा घेत सायबर गुन्हेगारांनी अनेक बनावट संकेतस्थळे तयार केली असून, या संकेतस्थळांवर नव्या आयफोनवर तब्बल २५ टक्क्यांपर्यंत सवलत देण्याचे आमिष दाखवले जात आहे. ही बनावट संकेतस्थळे हुबेहूब अधिकृत संकेतस्थळांसारखी दिसतील, अशा पद्धतीने तयार करण्यात आली आहेत. ग्राहकांचा विश्वास संपादन केल्यानंतर त्यांच्याकडून नाव, मोबाइल क्रमांक, ई-मेल पत्ता, व्हॉट्सअ‍ॅपशी संबंधित माहिती, शहर तसेच बँक किंवा कार्डविषयक तपशील मागवले जातात. या माहितीचा गैरवापर करून ग्राहकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता आहे.

### 25 टक्के सवलतीचे आमिष

आयफोन १८ प्रो आणि आयफोन १८ प्रो मॅक्सची किंमत अधिक असल्याने ग्राहकांना स्वस्तात हे फोन मिळावेत, यासाठी अनेक जण विविध संकेतस्थळांवर उपलब्ध असलेल्या सवलतींचा शोध घेतात. याच संधीचा फायदा सायबर गुन्हेगार घेत असल्याचे कॅस्परस्कीने म्हटले आहे. कॅस्परस्कीच्या तज्ज्ञांच्या मते, सायबर गुन्हेगारांनी तयार केलेल्या काही संकेतस्थळांवर आयफोन १८ प्रो आणि आयफोन १८ प्रो मॅक्सवर २५ टक्के सवलत देण्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे, काही संकेतस्थळांवर फोन खरेदीसाठी बिटकॉइनद्वारे पैसे भरण्याचाही पर्याय देण्यात आला आहे. हे बनावट संकेतस्थळ इंग्रजी, अरबी आणि पोर्तुगीज यांसह विविध भाषांमध्ये आकर्षक ऑफर्सचा प्रचार करत आहेत. प्रत्यक्षात मात्र अशा ऑफर्स उपलब्ध नसल्याचे कॅस्परस्कीने स्पष्ट केले आहे.

### कंपनीने जाहीर न केलेल्या रंगांचाही दावा

सायबर गुन्हेगार ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी आयफोन १८ प्रो विविध रंगांमध्ये उपलब्ध असल्याचे दाखवत आहेत. त्यातील काही रंग कंपनीने प्रत्यक्षात जाहीर किंवा सादर केलेले नसतानाही त्यांची जाहिरात करण्यात येत आहे. एखादी ऑफर अतिशय आकर्षक किंवा अविश्वसनीय वाटत असेल किंवा एखाद्या कंपनीने जाहीरच न केलेल्या उत्पादनाची जाहिरात दिसत असेल, तर तो फसवणुकीचा इशारा असू शकतो. त्यामुळे अशा ऑफर्सपासून सावध राहणे आवश्यक आहे.

### विश्वासार्ह संकेतस्थळाचा आभास

ग्राहकांचा संशय कमी व्हावा यासाठी ही बनावट संकेतस्थळे विश्वासार्ह आणि व्यावसायिक स्वरूपाच्या इंटरफेससह तयार केली जातात. ग्राहकांना वैयक्तिक माहिती भरण्यास तसेच पैसे पाठविण्यास प्रवृत्त केले जाते. मात्र, प्रत्यक्षात उत्पादन मिळण्याऐवजी ग्राहकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. काही संकेतस्थळांवर आयफोनच्या प्री-ऑर्डरचे आमिष दाखवले जाते. बनावट संकेतस्थळांवर ग्राहकांकडून पूर्ण नाव, मोबाइल क्रमांक, ई-मेल पत्ता, राहण्याचे शहर आणि व्हॉट्सअ‍ॅपशी संबंधित संपर्क माहिती मागितली जाते. ही माहिती मिळाल्यानंतर सायबर गुन्हेगार तिचा वापर सोशल इंजिनिअरिंगच्या माध्यमातून पुढील फसवणुकीसाठी करू शकतात. त्यामुळे केवळ आर्थिक नुकसानच नव्हे, तर वैयक्तिक माहितीचा गैरवापर होण्याचाही धोका आहे.

### ऑनलाइन खरेदी करताना कशी काळजी घ्याल?

- » नवीन उत्पादन खरेदी करण्यासाठी अधिकृत आणि विश्वासार्ह संकेतस्थळ किंवा दुकानाचाच वापर करा.
- » वैयक्तिक माहिती भरण्यापूर्वी संकेतस्थळाची सत्यता तपासा.
- » संकेतस्थळाच्या URLची रचना आणि कंपनीच्या नावाचे लेखन काळजीपूर्वक तपासा.
- » ऑनलाइन व्यवहार करताना शक्य असल्यास स्वतंत्र व्हर्च्युअल कार्ड किंवा सुरक्षित पेमेंट सेवा वापरा.
- » बँक खाते किंवा क्रेडिट कार्डची संवेदनशील माहिती अनोळखी संकेतस्थळावर देऊ नका.
- » आपल्या खात्यांसाठी बहु-घटक प्रमाणीकरण (Multi-Factor Authentication) सुरू ठेवा.
- » बँक खाते आणि कार्डवरील व्यवहारांवर नियमित लक्ष ठेवा.
- » थोडक्यात, आयफोनवर मिळणारी अविश्वसनीयरीत्या मोठी सवलत ही संधी नसून सायबर फसवणुकीचा सापळा असू शकतो. त्यामुळे स्वस्त ऑफरच्या आमिषापेक्षा संकेतस्थळाची सत्यता तपासणे अधिक महत्त्वाचे आहे.




# 1 ऑक्टोबरला गूगल रचणार अंतराळातील नवा अध्याय?

## प्रथमच TPU चिप्सची अंतराळात चाचणी; भविष्यातील डेटा सेंटरची नवी दिशा

**जगातील आघाडीची तंत्रज्ञान कंपनी गूगल १ ऑक्टोबरला अंतराळ तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल टाकण्याच्या तयारीत आहे. गूगल प्रथमच आपल्या टेंसर प्रोसेसिंग युनिट्स (TPU) चिप्स अंतराळात पाठवणार आहे. अंतराळातील कठीण वातावरणात या चिप्स किती प्रभावीपणे कार्य करू शकतात, याची चाचणी या मोहिमेद्वारे घेतली जाणार आहे. हा प्रयोग गूगलच्या 'प्रोजेक्ट सनकॅचर'चा भाग आहे.**

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित डेटा सेंटर अंतराळात उभारण्याची गूगलची संकल्पना आहे. त्यादृष्टीने अंतराळातील वातावरणात मोठ्या प्रमाणावरील मशीन लर्निंग पायाभूत सुविधा कार्यान्वित करता येतील का, हे तपासण्यासाठी ही चाचणी महत्त्वाची ठरणार आहे. गूगलच्या TPU चिप्स स्पेसएक्सच्या ट्रान्सपोर्टर-१८ राइडशेअर मोहिमेद्वारे अंतराळात पाठवल्या जाणार आहेत. ही मोहीम अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथील व्हँडेनबर्ग स्पेस फोर्स बेसवरून १ ऑक्टोबरला प्रक्षेपित करण्याचे नियोजन आहे. प्रक्षेपणात काही अडथळा आल्यास २ ऑक्टोबर हा पर्यायी दिवस ठेवण्यात आला आहे. या मोहिमेत TPU चिप्स पृथ्वीच्या निम्न कक्षेत (Low Earth Orbit - LEO) नेल्या जातील. तेथे त्यांची प्रत्यक्ष अंतराळातील परिस्थितीत चाचणी केली जाणार आहे.




### दोन मोठी आव्हाने

**१ किरणोत्सर्गाचा धोका :** अंतराळातील किरणोत्सर्गाचा इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे TPU चिप्सवर त्याचा किती परिणाम होतो, हे या चाचणीत तपासले जाणार आहे. गूगलच्या अपेक्षेनुसार, चिप्स काही वर्षे अशा किरणोत्सर्गाचा सामना करू शकतील.

**२ चिप्स थंड ठेवण्याचे आव्हान :** उच्च क्षमतेच्या संगणकीय चिप्समधून मोठ्या प्रमाणावर उष्णता निर्माण होते. पृथ्वीवरील डेटा सेंटरमध्ये पाणी, हवा आणि वीजेवर आधारित शीतकरण प्रणालींचा वापर केला जातो. मात्र अंतराळात वातावरण नसल्याने पारंपरिक शीतकरण पद्धती तशाच प्रकारे वापरता येत नाहीत. त्यामुळे TPU चिप्समधून निर्माण होणारी उष्णता अंतराळात प्रभावीपणे बाहेर कशी काढायची, हा महत्त्वाचा तांत्रिक प्रश्न आहे. गूगल या आव्हानावर उपाय शोधत आहे.

### रॉकेटच्या धक्क्यापासून किरणोत्सर्गापर्यंत चाचणी

पृथ्वीवर डेटा सेंटरमध्ये वापरल्या जाणाऱ्या TPU चिप्सना अंतराळातील अत्यंत वेगळ्या परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे. प्रक्षेपणादरम्यान होणारे धक्के, कंपन, अंतराळातील किरणोत्सर्ग आणि तापमानातील तीव्र बदल अशा विविध परिस्थितींमध्ये चिप्स कशा प्रकारे काम करतात, हे तपासले जाईल. गूगलसाठी हा प्रयोग केवळ चिप्सच्या कार्यक्षमतेची चाचणी नसून भविष्यातील अंतराळ-आधारित संगणकीय पायाभूत सुविधांच्या शक्यतांचा शोध घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. उपलब्ध माहितीनुसार, 'प्रोजेक्ट सनकॅचर'अंतर्गत होणारी ही गूगलची पहिली ऑर्बिटल हार्डवेअर चाचणी आहे. भविष्यात मोठ्या प्रमाणावरील मशीन लर्निंग पायाभूत सुविधा उपग्रहांच्या माध्यमातून अंतराळात नेणे शक्य होईल का, याचा शोध या प्रयोगातून घेतला जाणार आहे. डेटा सेंटरसाठी मोठ्या प्रमाणावर विजेची आवश्यकता असते. गूगलच्या संकल्पनेनुसार, पृथ्वीच्या निम्न कक्षेत असलेल्या सौरऊर्जेवर आधारित प्रणालींना सूर्यप्रकाश अधिक प्रमाणात आणि सातत्याने उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे भविष्यात अंतराळातील डेटा सेंटरमधून मोठ्या प्रमाणावर ऊर्जा मिळवता येण्याची शक्यता तपासली जात आहे. प्रयोगशाळेतील चाचण्यांमध्ये TPU चिप्सची कामगिरी तपासण्यात आली आहे. आता प्रत्यक्ष अंतराळातील वातावरणात त्यांची कार्यक्षमता तपासली जाणार आहे.

### पुढचा टप्पा काय?

१ ऑक्टोबरची चाचणी यशस्वी ठरल्यास गूगल २०२७ मध्ये पुढील चाचण्या घेण्याच्या तयारीत आहे. भविष्यात अंतराळात कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी आवश्यक संगणकीय पायाभूत सुविधा उभारण्याच्या दृष्टीने या प्रयोगाकडे महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. TPU चिप्सची अंतराळातील ही पहिली चाचणी यशस्वी ठरली, तर पृथ्वीवरील डेटा सेंटरच्या पलीकडे AI संगणनासाठी अंतराळाचा वापर करण्याच्या संकल्पनेला नवी दिशा मिळू शकते.

# महिलांना आता ओळख लपवून सायबर गुन्ह्याची तक्रार करता येणार; जाणून घ्या संपूर्ण प्रक्रिया

**महिला किंवा मुलांना ऑनलाइन छळ, ब्लॅकमेलिंग अथवा अन्य सायबर गुन्ह्यांचा सामना करावा लागल्यास अनेकदा सामाजिक दबाव किंवा बदनामीच्या भीतीमुळे तक्रार करण्याचे टाळले जाते. मात्र, आता अशा पीडितांना आपली ओळख उघड न करता सायबर गुन्ह्याची तक्रार दाखल करण्याचा पर्याय उपलब्ध आहे.**

भारत सरकारच्या राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टलवर (National Cyber Crime Reporting Portal) महिला आणि मुलांशी संबंधित सायबर गुन्ह्यांसाठी 'Report Anonymously' (ओळख न सांगता तक्रार करा) हा पर्याय उपलब्ध आहे. त्यामुळे पीडित व्यक्ती आपली वैयक्तिक ओळख उघड न करता संबंधित सायबर गुन्ह्याची माहिती प्रशासनापर्यंत पोहोचवू शकते.

### कोणते पुरावे द्यावे लागतात?

- » संबंधित संभाषणाचे स्क्रीनशॉट
- » छायाचित्रे किंवा व्हिडिओ
- » कॉल रेकॉर्डिंग
- » आरोपीचा मोबाइल क्रमांक
- » सोशल मीडिया खाते किंवा प्रोफाइलची माहिती
- » ई-मेल किंवा संदेशांचे पुरावे
- » उपलब्ध पुराव्यांमुळे संबंधित घटनेची चौकशी करण्यास मदत होऊ शकते.



### 'रिपोर्ट ॲनॉनिमसली' पर्याय कसा वापराल?

राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टलवर महिला किंवा मुलांशी संबंधित विभागात गेल्यानंतर 'Report Anonymously' हा पर्याय निवडता येतो. या माध्यमातून तक्रारदाराची ओळख गुप्त ठेवून तक्रार नोंदवता येते. मात्र, तक्रार नोंदवताना संबंधित घटनेची सत्यता पडताळण्यासाठी काही पुरावे सादर करावे लागू शकतात. त्यामुळे उपलब्ध असलेले स्क्रीनशॉट, छायाचित्रे, व्हिडिओ, कॉल रेकॉर्डिंग किंवा संशयित व्यक्तीचा मोबाइल क्रमांक यांसारखे पुरावे सुरक्षित ठेवणे महत्त्वाचे आहे.

### कोणत्या सायबर गुन्ह्यांची तक्रार करता येते?

- » सायबर बुलिंग म्हणजे ऑनलाइन माध्यमातून त्रास देणे किंवा धमकावणे.
- » सायबर स्टॉकिंग म्हणजे इंटरनेट किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून एखाद्याचा ऑनलाइन पाठलाग करणे.
- » अश्लील सामग्री प्रसारित करणे.
- » पीडितेची खासगी छायाचित्रे किंवा व्हिडिओ तिच्या संमतीशिवाय प्रसारित करणे.
- » ऑनलाइन सेक्सटॉर्शन आणि ब्लॅकमेलिंग.
- » सोशल मीडिया किंवा ई-मेल खाते हॅक करणे.
- » बनावट सोशल मीडिया प्रोफाइल तयार करून गैरवापर करणे.
- » ओळख चोरी करणे.
- » या प्रकारच्या तक्रारी काही परिस्थितींमध्ये आपली ओळख न उघड करता नोंदवता येतात.

### आर्थिक सायबर फसवणुकीचीही तक्रार

राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टलवर केवळ महिलांशी संबंधित ऑनलाइन छळाच्या तक्रारीच नव्हे, तर इतर अनेक प्रकारच्या सायबर गुन्ह्यांची माहितीही देता येते. त्यात पुढील प्रकारांचा समावेश आहे...

- » UPI, नेट बँकिंग, क्रेडिट किंवा डेबिट कार्ड आणि डिजिटल वॉलेटमधील फसवणूक
- » बनावट नोकरी किंवा गुंतवणूक योजनांच्या माध्यमातून होणारी फसवणूक
- » फिशिंग आणि सिम-स्वॅप फसवणूक
- » सोशल मीडिया खाते किंवा ई-मेल हॅकिंग
- » बनावट ऑनलाइन प्रोफाइल
- » रॅन्समवेअर, मालवेअर किंवा व्हायरस हल्ले
- » सायबर तस्करीशी संबंधित गुन्हे
- » क्रिप्टोकरन्सीशी संबंधित फसवणूक

### तक्रार कुठे करायची?

राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टलवर तक्रार दाखल करण्यासाठी 'File a Complaint' हा पर्याय निवडावा. या पोर्टलचा वापर इंटरनेट, मोबाइल, संगणक आणि अन्य डिजिटल माध्यमांशी संबंधित गुन्ह्यांची तक्रार करण्यासाठी केला जातो. मात्र, या पोर्टलवर केवळ सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी नोंदवता येतात. उदाहरणार्थ, घरगुती हिंसाचारासारखा सायबर गुन्ह्याशी संबंध नसलेला प्रकार घडल्यास त्याची तक्रार संबंधित पोलीस ठाण्यात किंवा अन्य सक्षम यंत्रणेकडे करावी लागेल. ऑनलाइन छळ, ब्लॅकमेलिंग किंवा खासगी छायाचित्रे-व्हिडिओंचा गैरवापर होत असल्यास घाबरून गप्प राहण्याऐवजी उपलब्ध पुरावे सुरक्षित ठेवणे आणि योग्य यंत्रणेकडे तक्रार करणे महत्त्वाचे आहे. ओळख उघड होण्याची भीती असलेल्या महिला आणि मुलांसाठी 'Report Anonymously' हा पर्याय विशेषतः उपयुक्त ठरू शकतो.

# मोफत आंतरराष्ट्रीय रोमिंगचा लाभ; 170 हून अधिक देशांत मिळणार सुविधा

परदेशात प्रवास करणाऱ्या ग्राहकांसाठी व्होडाफोन आयडिया (Vi)ने महत्त्वाची घोषणा केली आहे. कंपनीने काही निवडक पोस्टपेड, प्रीपेड आणि कॉर्पोरेट प्लॅनमध्ये मोफत आंतरराष्ट्रीय रोमिंगची सुविधा समाविष्ट केली आहे. त्यामुळे संबंधित प्लॅन असलेल्या ग्राहकांना परदेशात प्रवास करताना प्रत्येक वेळी स्वतंत्र रोमिंग पॅक किंवा ट्रॅव्हल eSIM घेण्याची आवश्यकता भासणार नाही. कंपनीच्या माहितीनुसार, या सुविधेचा लाभ १७० हून अधिक देशांमध्ये घेता येणार आहे. ग्राहकांना वर्षातून तीन वेळा या मोफत रोमिंग सुविधेचा लाभ घेता येईल. मात्र, सुविधा आणि तिच्या मर्यादा संबंधित रिचार्ज प्लॅननुसार बदलू शकतात.

**१७० हून अधिक देशांमध्ये कनेक्टिव्हिटी**

Viचा दावा आहे की या सुविधेमुळे ग्राहकांना १७० हून अधिक देशांमध्ये कनेक्टिव्हिटी मिळेल. मात्र, मोफत रोमिंगचा अर्थ परदेशात भारतातील प्लॅनप्रमाणे अमर्यादित सेवा मिळेल, असा नाही. इंटरनॅशनल डेटा अलाउन्स, आउटगोइंग कॉलचे मिनिट्स आणि अन्य सुविधा ग्राहकाच्या संबंधित प्लॅननुसार निश्चित केल्या जातील. त्यामुळे परदेशात जाण्यापूर्वी आपल्या प्लॅनमध्ये नेमक्या कोणत्या सुविधा आणि किती मर्यादा आहेत, हे तपासणे आवश्यक आहे.

# 'मातोश्री' वृद्धाश्रमातील एका वृद्धाने लोखंडी रॉडने हल्ला करून दोन सहकाऱ्यांना संपवले



**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– शहराजवळील विळद घाट परिसरातील प्रसिद्ध 'मातोश्री' वृद्धाश्रमात अत्यंत धक्कादायक आणि सुन्न करणारी घटना घडली आहे. वृद्धांच्या सुरक्षिततेसाठी आणि आधारासाठी असलेल्या या वृद्धाश्रमातच एका वृद्धाने आपल्या सहकारी वृद्धांवर लोखंडी रॉडने रानटी हल्ला केला. या रक्तरंजित घटनेत दोघांचा जागीच मृत्यू झाला असून इतर ६ वृद्ध गंभीर जखमी झाले आहेत.

मातोश्री वृद्धाश्रमात वास्तव्यास असलेला आरोपी राजू घुले याने पहाटे ६ च्या सुमारास झोपेत असलेल्या सहकाऱ्यांवर अचानक हल्ला चढवला. या घटनेमुळे संपूर्ण वृद्धाश्रमात रक्ताचा सडा पसरला होता. घटनेची माहिती मिळताच एमआईडीसी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेचे (डउइ) पथक घटनास्थळी दाखल झाले असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी राजू घुले याचा उजवा हात सतत थरथरत होता. याच कारणावरून वृद्धाश्रमातील इतर सहकारी त्याला नेहमी चिडवत असत. याचाच तीव्र राग मनात धरून आरोपीने पहाटे ६ वाजता सर्वजण झोपेत असताना लोखंडी रॉडने डोक्यात आणि पायावर जोरदार वार केले.

या प्राणघातक हल्ल्यात मंकाळेश्वर हेणे आणि दत्तात्रेय हारके या दोन वृद्धांचा मृत्यू झाला. तर गणेश घोडके, बाळासाहेब घाडगे, गोरख फुंदे, साहेबराव भवर, लिंबराज फिसके आणि संतोष पिरगल हे ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना अहिल्यानगरच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून एकाची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे.

वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक दिलीप चोरडिया यांच्या फिर्यादीवरून, अहिल्यानगरच्या एमआईडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी राजू घुले हा कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी (कुंभारी) येथील रहिवासी आहे. तो अविवाहित असून त्याचे भाचे प्रयाग सानप यांनी त्याला ३ नोव्हेंबर २०२५ रोजी मातोश्री वृद्धाश्रमात दाखल केले होते. विशेष म्हणजे, आरोपीची वृद्धाश्रमातून त्याच्या बहिणीकडे रवानगी होणार होती आणि त्याची बहीण त्याला घेण्यासाठी नाशिकहून नगरकडे येत होती. परंतु, बहीण पोहोचण्यापूर्वीच आरोपीने हे टोकाचे पाऊल उचलून दोन सहकाऱ्यांचा जीव घेतला. पोलिसांनी हत्येसाठी वापरलेली लोखंडी रॉड हस्तगत केला असून पुढील तपास सुरू आहे.

---

पान १ वरून...

**मुदखेड तालुका दुष्काळातून...**

(उबाठा) चे अंकुश मामीडवार, विश्वनाथ पवार निवघेकर, तेजाब पाटील मुंगल, माजी उपनगराध्यक्ष करीम खान, गजानन संबोड, महेश देशमुख बारडकर, युवा काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील, अतीक अहमद, शिवानंद देवके, विठ्ठल आचार्य, बाळू पांचाळ, महेश पवार, बालाजी शिंदे, ओबीसी तालुकाध्यक्ष बालाजी गुळेवाड, कमलकिशोर पवार, शिवाजी वडजे, बळवंत पाटील खुजडेकर, दिगंबर पाटील वासरीकर, नंदकिशोर पवार, सुरेश सूर्यवंशी, शिवाजी गणरस, योगेश पवार, माणिकराव मुंगल, सुनील जाधव, मनोहर पाटील कुरे, बालाजी पाटील येडे यांच्यासह मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

-------------

**शिंदे गटाच्या नगरसेविकेवर...**

सत्तेचा दुरुपयोग करून नगरविकास खात्याचे मंत्री एकनाथ शिंदे व त्यांचे चिरंजीव खा. श्रीकांत शिंदे यांचे सहकारी गजानन पाटील यांनी नांदेड शहरात अनधिकृत बांधकामाचा नवा पायंडा पाडला असल्याचा आरोप ठाकरे सेनेने केला आहे.

महापालिका अधिनियमाचा भंग केल्याप्रकरणी शिंदे गटाच्या नगरसेविकेचे पद तत्काळ रद्द करून पोटनिवडणूक घ्यावी, अशी मागणी ठाकरे सेनेचे मुख्य महानगरप्रमुख प्रकाश मारावार, उमेदवार बेगाबाई विश्वनाथ कोकाटे, उपजिल्हाप्रमुख विजय बगाटे, नवज्योत सिंग गाडीवाले, नितीन सरोदे व पिंटू पाटील कोकाटे यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्याकडे केली आहे.

------------

**२४ वर्षांपासून गुलालमुक्त...**

वर्ष पालन करण्याची कदाचित राज्यातील ही पहिलीच घटना असावी.

यावर्षी, गणेश विसर्जन मिरवणुकीचे औचित्य साधून, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी औसा शहरास भेट देऊन, शहरातील सर्व २८ गणेश मंडळांना सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव केला. गुलाल मुक्त गणेशोत्सवाचा आदर्शवत उपक्रम औसा शहरातील सर्व गणेश मंडळांनी गेली २४ वर्ष जपला असून, शहरातील सामाजिक ऐक्य, एकोपा व एकात्मता जोपासण्यात या मंडळांचे मोलाचे योगदान राहिले आहे, हा उपक्रम इतर गणेश मंडळांसाठीही निश्चितच प्रेरणादायी व अनुकरणीय ठरला आहे, अशी भावना पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी व्यक्त केली. यावेळी, तत्कालीन पोलीस निरीक्षक कालिदास सूर्यवंशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या कामगिरीचा त्यांनी आवर्जून उल्लेख करुन, सदरचा स्तुत्य उपक्रम दीर्घकाळ यशस्वी करण्याचे सर्व श्रेय औसा शहरातील सर्व गणेश मंडळे व शांतता प्रेमी नागरीकांना दिले.

याप्रसंगी, लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, औसा पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक कालिदास सूर्यवंशी यांच्यासह उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी, तहसीलदार घनश्याम अडसूळ, नगर परिषदेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे, औसा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी रेवणनाथ डमाळे व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आरक्षण उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी २९ सप्टेंबर रोजी मुंबईत मातंग समाजाचा महामोर्चा

**नांदेड(प्रतिनिधी)**–अनुसूचित जाती आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करून मातंग समाजासह आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहिलेल्या अनुसूचित जाती घटकांना न्याय्य वाटा मिळावा, या मागणीसाठी मातंग समाजाचा संघर्ष गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. या मागणीच्या पुढील टप्प्यात दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबई येथे निर्धार महामोर्चाचे आयोजन करण्यात आले असून, नांदेड जिल्ह्यातून मोठ्या संख्येने समाजबांधव मुंबईला जाण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

सकल मातंग समाज व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने महाराष्ट्रात या मागणीसाठी सातत्याने मोर्चे, आंदोलने व जनजागृती करण्यात आली आहेत. मातंग समाजाच्या म्हणण्यानुसार, राज्यभरात आतापर्यंत मोठ्या संख्येने मोर्चे काढण्यात आले असून, आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहिलेल्या घटकांना न्याय मिळावा आणि उपवर्गीकरणाची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.






## ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी आता एनसीएमसी कार्ड अनिवार्य

### ■ १ ऑक्टोबरपासून सवलतीचे तिकीट एनसीएमसी कार्डद्वारेच

**मुंबई(प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) विविध सवलत योजनांचा लाभ घेणाऱ्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी १ ऑक्टोबर २०२६ पासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. सवलतीचे तिकीट देताना एनसीएमसी कार्डचा वापर करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला असून, त्यासाठी कार्ड नोंदणी व वितरणाची प्रक्रिया राज्यभरातील आगार आणि बसस्थानकांवर सुरू करण्यात आली आहे.

एसटी महामंडळाकडून विविध सामाजिक घटकांना शासन निर्देशानुसार सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा दिली जाते. त्यामध्ये अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना मिळणाऱ्या सवलतीचा समावेश आहे. या सवलतीच्या प्रवासाचे अधिक सुलभ आणि डिजिटल व्यवस्थापन करण्यासाठी एनसीएमसी कार्ड प्रणालीचा वापर करण्यात येत आहे.

---

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर-431 002
Maharashtra State Board of Waqfs, Chhatrapati Sambhajinagar-४३१००२
مہاراشٹراسٹیٹ وقف بورڈ، چھترپتی سمبھاجی نگر۔ ۴۳۱۰۰۲

Website: www.mahawakf.com, Email: ceomsbw@gmail.com Tele: 0240-2401584

क्रमांक.मरावमं/अतियात/नों.क्र. / 258 / 4823 /२०२६ दिनांक: - 24 SEP 2026

**FORM 40**
**[See rule 32(1)]**
**PUBLIC NOTICE**

Whereas a vacancy in the office of Mutawalli of Jama Masjid, at Juni Chawdi, situated in gaothan land, village Deglur, Tq. Deglur, Dist. Nanded has arisen and as per the terms of Deed, there is no other person to be appointed against for this vacancy, hence, it is hereby notified for the information of the public or persons interested in this Waqf that Mr. Sayyed Aqeel Ali Ishaq Ali, R/o. Kazi Galli, Hotel Base Galli, Deglur, Nanded has been proposed by District Waqf Officer Nanded for filling up of the vacancy of the Mutawalli of the said institution as per details in the schedule below for being appointed as Temporary Mutawalli, for such period and under such terms and conditions as the Maharashtra State Board of Waqf may think fit.

**Schedule**

| Sr. No. | Item | Details |
|---|---|---|
| 1 | Name of the Waqf Institution | Jama Masjid, at Juni Chawdi, situated in gaothan land, village Deglur, Tq. Deglur, Dist. Nanded |
| 2 | Registration No. and Date | MSBW/NDD/205/2015 |
| 3 | Detail of Appointment of Mutawalli under the Waqf Deed | Smt. Ahmed Bi W/o Sayyed Sadaullah Saheb as per Govt. Gazette Sr. No. 04, Part "C" date 23.01.1975, Tq. Degloor |
| 4 | Name of person proposed as Mutawalli under section 63 of the Waqf Act, 1995 | Mr. Sayyed Aqeel Ali Ishaq Ali |
| 5 | Name of the former Mutawalli | Smt. Ahmed Bi W/o Sayyed Sadaullah Saheb |

Anyone having objections/suggestions to this proposal, may inform the same in writing to the Chief Executive Officer/authorized Officer within seven days, from the date of publication of this Notice failing which, it will be presumed that there are no objections/ suggestions and the Board will proceed further in appointing the person notified herein above as the Temporary Mutawalli of the above said institution under section 63 of the Waqf Act, 1995.

23/09/26
O/c
(Faiyaz Khan)
Chief Executive Officer
Maharashtra State Board of Waqf
Chhatrapati Sambhajinagar

---

## शाळांजवळ जंक फूडच्या विक्रीवर कडक नियम

**मुंबई (प्रतिनिधी)**–शाळांमध्ये आणि शाळांच्या ५० मीटर परिसरात जास्त मीठ, साखर आणि फॅट असलेल्या खाद्यपदार्थांच्या विक्रीवर निर्बंध घालण्याच्या नियमांना आता अधिक स्पष्टता मिळण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांपासून याबाबत नियम अस्तित्वात असले तरी नेमके कोणते खाद्यपदार्थ या नियमांच्या कक्षेत येतील, याबाबत स्पष्ट यादी उपलब्ध नव्हती. आता भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण म्हणजेच ऋडडखने यासंदर्भातील नवीन नियमांचा मसुदा प्रसिद्ध केला आहे.

नव्या मसुद्यानुसार, एखादा खाद्यपदार्थ शाळांच्या परिसरात विक्रीसाठी योग्य आहे की नाही, हे त्यातील मीठ, साखर आणि फॅटच्या प्रमाणाच्या आधारे ठरवले जाणार आहे. त्यामुळे चिप्स, बिस्किटे, पॅकेज्ड स्नॅक्स किंवा शीतपेयांसारख्या पदार्थांवर सध्या थेट बंदी घालण्यात आलेली नाही. संबंधित खाद्यपदार्थांमध्ये पोषक घटकांचे प्रमाण किती आहे, यानुसार त्यांच्यावर निर्बंध लागू होण्याची शक्यता आहे.

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८३५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ८७९ व ८८० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, गजानंद बाबू जाधव रा. डोडर्णा, ता. मुधोळ, जि. निर्मल यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ८७९, ८८० वार्ड नं. १५ अफरीदी साहेबाज खान व इतर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २६४/२०२३ दि. २१/२/२०२३ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-कॉलनी रस्ता, पश्चिमेस-प्लॉट क्र.५१, दक्षिणेस-प्लॉट क्र.७३, उत्तरेस -परमेश्वर लिंगारेड्डी यांचे शेत.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८३८

नाव परिवर्तन वार्ड क्र. १३ मालमत्ता क्र. १६७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, तानाजी श्यामराव वानखेडे रा. पळसपूर, ता. हिमायतनगर, यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १६७, वार्ड नं. १३ अनिल भुजंगराव नरवाडे यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १११६/२६ दि. २१/९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-मालमत्ता क्र. १६१, पश्चिमेस-कॉलनी रस्ता, दक्षिणेस-मालमत्ता क्र.१६६, उत्तरेस -मालमत्ता क्र.१६८.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८३७

नाव परिवर्तन वार्ड क्र. ८ मालमत्ता क्र. १४३ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, महेबुब मैनोद्दीन रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर, यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १४३, वार्ड नं. ८ मैनोद्दीन अफजलोद्दीन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. -- दि. २१/९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-बोळ, पश्चिमेस-नांदेड-किनवट रोड, दक्षिणेस-रस्ता, उत्तरेस -महेबुब यांचे घर.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८३९

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ अ मालमत्ता क्र. ७१६ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख महेबुब शेख बाबामियाँ रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर, यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ७१६, वार्ड नं. १८ अ अब्दुल कलीम मोहम्मद सरवर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं.११०७/२०२६ दि. १६/९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-प्लॉट क्र. १२१, पश्चिमेस-२० फुटाचा रस्ता, दक्षिणेस-प्लॉट नं. १११, उत्तरेस -प्लॉट क्र. १०९.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८३८

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ अ मालमत्ता क्र. ६६७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख असलम शेख साबीर रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर, यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६६७, वार्ड नं. १८ अ मिर्झा अक्रम अली बेग यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं.११०९/२०२६ दि. २१/९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-प्लॉट क्र. ६८, पश्चिमेस-२० फुटाचा रस्ता, दक्षिणेस-प्लॉट नं. ६२, उत्तरेस -प्लॉट क्र. ६०.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८४१

नाव परिवर्तन वार्ड क्र. ५ मालमत्ता क्र. ७४/१ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, संतोष धोंडबा पुठेवार रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर, यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ७४/१, वार्ड नं. ५ कलावतीबाई धोंडबा पुठेवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं.३४३८/२६ दि. १५/९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-चव्हाण यांचे घर, पश्चिमेस-प्रभाकर पुठेवार यांचे घर, दक्षिणेस-परोटे यांचे घर, उत्तरेस -रोड.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८४०

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ८१५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख वहीद शेख रब्बानी रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर, यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ८१५, वार्ड नं. १५ अफरीदी साहेबाज खान साबेर खान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं.१००९/२०२६ दि. १०/८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-प्लॉट नं. २७ व २८, पश्चिमेस-कॉलनी रस्ता, दक्षिणेस-प्लॉट क्र. ११, उत्तरेस -परमेश्वर तिपन्नवार यांचे शेत

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ५९९

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९ मालमत्ता क्र. १६७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, फेरोज खान शबीर खान रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १६७ वार्ड नं. १९ शबीर खान इब्राहीम खान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २३०४/२६ दि. २४/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-शबीर खान इब्राहीम खान, पश्चिमेस-रस्ता, दक्षिणेस-अहेमद खान बशीर खान, उत्तरेस -रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८३३

नाव परिवर्तन वार्ड क्र. १४ मालमत्ता क्र. ५६/२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सलमा फिरदोस शेख महेबुब रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५६/२ वार्ड नं. १४ शेख महेबुब शेख शादुला यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २२५८/२६ दि. २४/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-बीबीसाब यांची जागा, पश्चिमेस-शेख मजीद, दक्षिणेस-शेख नजीर, उत्तरेस -रोड.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८३२

नाव परिवर्तन वार्ड क्र. १४ मालमत्ता क्र. ४०८ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख खालेद अब्दुल जलील रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४०८ वार्ड नं. १४ अब्दुल मोईज अब्दुल वहीद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २६४३/२६ दि. १४/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-मालमत्ता क्र. ४०७, पश्चिमेस-मालमत्ता क्र. ४०९, दक्षिणेस-१८ फुटाचा रस्ता, उत्तरेस -मालमत्ता क्र. ३९१

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ६३०

नाव परिवर्तन वार्ड क्र. १४ मालमत्ता क्र. ४०७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख जाहेद अब्दुल जलील रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४०७ वार्ड नं. १४ अब्दुल मोईज अब्दुल वहीद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २६४४/२६ दि. १४/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-मालमत्ता क्र. ४०६, पश्चिमेस-मालमत्ता क्र. ४०८, दक्षिणेस-१८ फुटाचा रस्ता, उत्तरेस -मालमत्ता क्र. ३९२.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ५६३

नाव परिवर्तन वार्ड क्र. १२ मालमत्ता क्र. ८७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, तामीद खान हमीद खान पठाण रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ८७ वार्ड नं. १२ शेख कलीम शेख अमीन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २९४८/२६ दि. २१/०९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-रोड, पश्चिमेस-रोड, दक्षिणेस-जलील सर, उत्तरेस -जफरलाल.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८३४

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ७८० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, आयेशाबी महेबुब खान पठाण रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ७८० वार्ड नं. १५ अब्दुल गुफरान अब्दुल हमीद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ११०३/२६ दि. १०/९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-प्लॉट क्र.५५, पश्चिमेस-प्लॉट क्र.५१, दक्षिणेस-प्लॉट क्र.५३, उत्तरेस -२० फुटाचा अंतर्गतरस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर प्रगटन

माझे पक्षकार पौर्णिमा सुधाकर पळशीकर (सौ. पौर्णिमा संदीप उत्तरवार), रा. एमआयडीसी, नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबंधीतास सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी विठ्ठल गंगाराम केंद्रे व सौ. प्रभावती विठ्ठलराव केंद्रे, दोघे रा. भगवान बाबा चौक, सिडको नांदेड यांचे मालकी व ताब्यातील नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे स्थित वसरणी, ता.जि.नांदेड येथील सर्वे नं. ६४ व ६५ पैकी प्लॉट नं. ५२, ज्याचे एकूण क्षेत्रफळ १६५ चौ.मी. असुन गुंठेवारी सुध्दा झालेली आहे तो कायमचा विकत घेण्याचा सौदा करार केला असून ज्याच्या चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट क्र. ५१, पश्चिमेस : प्लॉट क्र. ६१, दक्षिणेस : ७.५० मीटर रूंद रोड व उत्तरेस : प्लॉट क्र. ६० असुन सदरील प्लॉट विकत घेण्याचा सौदाकरार केला असुन सौदा करारानुसार बयाणा रक्कम सुध्दा दिलेली आहे. तरी वरील वर्णनाच्या प्लॉट बाबत कुणाचे काही उजर, गहाण किंवा इतर काही आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द पासून ०७ दिवसाच्या आत माझे कार्यालयात येवुन लेखी आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचेही काही आक्षेप नाही आल्यास माझे पक्षकार उर्वरीत रक्कम देऊन स्वत:चे नावे खरेदीखत करुन घेतील व मुदतीनंतर आलेले आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत.

करीता सबब जाहीर प्रगटन.

मार्फत
ॲड. राजकुमार एस. भोसले,
जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड
मो. नं. ७५८८५२६४३८.

जाहीर प्रगटन देणार
पौर्णिमा सुधाकर पळशीकर
(सौ. पौर्णिमा संदीप उत्तरवार),
रा. एमआयडीसी, नांदेड.
मो. नं. ७०२००१४१९२,
९९२३४६६४४४

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# नांदेडकरांचा पर्यावरणपुरक गणेशोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद; हजारो मूर्तींचे विसर्जन, १५ टनांहून अधिक निर्माल्य संकलित

**नांदेड (प्रतिनिधी)–** यंदाच्या गणेशोत्सवात नांदेडकरांनी परंपरेचे भान जपत पर्यावरणाविषयीची सामाजिक जबाबदारी ओळखून महानगरपालिकेच्या आवाहनाला अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला. सार्वजनिक व घरगुती गणेश विसर्जनादरम्यान शहरात एकूण ४० हजार ८९७ गणेश मूर्तींचे पर्यावरणपुरक पद्धतीने विसर्जन करण्यात आले असून, विसर्जन स्थळांवरून एकूण १५.१७६ मेट्रिक टन निर्माल्य संकलित करण्यात आले आहे, अशी माहिती मनपा प्रशासनामार्फत देण्यात आली.



महानगरपालिकेच्या वतीने यंदाचा गणेशोत्सव पूर्णपणे पर्यावरणपुरक पद्धतीने साजरा करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली होती. नदीपात्र, तलाव आणि इतर नैसर्गिक जलस्त्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी सोशल मीडिया, तसेच शहरातील प्रमुख चौकांमध्ये होर्डिंग्ज, बॅनर्स आणि पोस्टर्सद्वारे व्यापक जनजागृती करण्यात आली होती. नागरिकांनी आपले निर्माल्य गोदावरी नदीपात्रात किंवा इतर तलावांमध्ये टाकू नये, असे आवाहन प्रशासनातर्फे सातत्याने करण्यात आले होते.

नागरिकांची गैरसोय होऊ नये आणि नैसर्गिक जलस्त्रोतांचे रक्षण व्हावे, या उद्देशाने महापालिकेमार्फत शहरात ठिकठिकाणी कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आली होती. तसेच विविध प्रभागांमध्ये घरगुती गणेश मूर्तींसाठी 'मूर्ती संकलन केंद्रे' उभारण्यात आली होती. या पर्यायी व्यवस्थेचे नागरिकांनी मनापासून स्वागत केले. मोठ्या संख्येने भाविकांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे विसर्जन कृत्रिम तलावांमध्ये केले, तर अनेकांनी संकलन केंद्रांवर मूर्ती सुपूर्द करून पर्यावरण रक्षणात खारीचा वाटा उचलला. विसर्जनाच्या दिवशी महापालिकेच्या स्वच्छता पथकांनी तत्परतेने काम करत विसर्जन स्थळांवरून १५.१७६ मेट्रिक टन निर्माल्य गोळा केले. यामुळे नदीपात्र कचरामुक्त राहण्यास मोठी मदत झाली. शहरासोबतच ग्रामीण भागातील गणेश मूर्तींचेही मोठ्या प्रमाणावर विसर्जन करण्यात आले.

नांदेड शहर स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त ठेवण्याच्या महापालिकेच्या मोहिमेला नांदेडकरांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी सर्व गणेशभक्त, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, नागरिक आणि अहोरात्र काम करणाऱ्या महापालिकेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. भविष्यातही नागरिकांच्या सहकार्याने नांदेड शहर पर्यावरणपुरक उपक्रमांमध्ये अग्रस्थानी राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मात्र, मोठ्या मूर्तींच्या प्रतिकात्मक विसर्जनास अल्प प्रतिसाद मिळाल्याबद्दल खंत व्यक्त करत पुढील वर्षी अधिक प्रयत्न करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

गोदावरी व आसना नदीतील पाणी प्रदूषित होऊ नये व जलसंपत्तीचे रक्षण करण्याच्या दृष्टीने पर्यावरणपुरक कृत्रिम तलावात लहान व मध्यम आकाराच्या मूर्तींचे आणि खदान व कृत्रिम तलावात मोठ्या गणेश मूर्तींचे विसर्जन करून पर्यावरणपुरक गणेशोत्सव पार पाडण्यात आला.

# मुदखेड व मुखेडचा दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश करा

- माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण व आ. चिखलीकर यांची मागणी
- आ. चिखलीकर घेणार आज मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुदखेड व मुखेडचा दुष्काळ तालुक्यांमध्ये समावेश करा अशी मागणी खा. अशोकराव चव्हाण व आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केली आहे. याबाबात आज प्रतापराव पाटील चिखलीकर हे मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहेत.

याबाबत खा. अशोकराव चव्हाण यांनी मुख्यमंत्र्यांना सविस्तर पत्र पाठवले असून, त्यांच्याशी दूरध्वनीवरूनही चर्चा केली आहे. मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात खा. अशोकराव चव्हाण यांनी निदर्शनास आणून दिले आहे की, मुदखेड तालुक्यात सरासरीच्या ८५ टक्के तर मुखेडमध्ये ८१ टक्के पावसाची नोंद असली, तरी एकाच दिवशी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने ही आकडेवारी वाढलेली आहे. प्रत्यक्षात पावसाचे वितरण अत्यंत असमान राहिले आहे. शिवाय, पिकांच्या वाढीसाठी सर्वात निर्णायक असलेल्या ऑगस्ट महिन्यातच पावसाचा मोठा खंड पडल्याने पिकांची वाढ खुंटली आणि शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले.

पावसाचा प्रदीर्घ खंड आणि पिकांचे झालेले अतोनात नुकसान पाहता, यंदा शेतकऱ्यांच्या हाती कोणतेही उत्पन्न येणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे केवळ तांत्रिक निकषांवर न अडकता, विशेष बाब म्हणून पिकांची प्रत्यक्ष वाढ आणि झालेले नुकसान लक्षात घेऊन मुदखेड व मुखेड या दोन्ही तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश करावा व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी खा. अशोकराव चव्हाण यांनी केली आहे.

राज्य शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांच्या यादीत नांदेड जिल्ह्यातील मुखेड व मुदखेड तालुक्यांचा समावेश न झाल्याने या दोन्ही तालुक्यांना दुष्काळग्रस्त घोषित करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांच्याकडे निवेदन देण्यात आले असून, या प्रश्नाबाबत विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष तथा माजी खासदार आ. प्रतापराव पाटील चिखलीकर हे मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहेत.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार अविनाशराव घाटे, माजी आमदार सुभाषराव साबणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# मुखेड तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–**महाराष्ट्र शासनाच्यावतीने नुकतीच दुष्काळी तालुक्यांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये ज्या तालुक्यामध्ये दुष्काळाची भीषण परीस्थिती आहे अशा २६५ तालुक्यांचा या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. परंतु दुर्देवाने नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्याचा या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आला नाही. मुखेड तालुका दुष्काळग्रस्त भाग म्हणून जाहीर करावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे करण्यात आली आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष तथा माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आ. मोहनराव हंबर्डे, माजी आ. अविनाशराव घाटे, माजी आ. सुभाषराव साबणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर आदींची उपस्थिती होती.

मुखेड तालुका हा डोंगराळ भाग असून यावर्षी अत्यल्प पाऊस झाला आहे. दोन पावसातील खंड ३५ दिवसाच्यावर असल्यामुळे पिकाची वाढ झाली नसून पावसाअभावी उभी पीके करपून गेली. त्यामुळे येथील शेतकरी अडचणीत सापडला आहे. सुनेत्रा पवार यांची गेवराई येथे भेट धेऊन मुखेड तालुक्याचा दुष्काळी यादीमध्ये समाविष्ट करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी, अडचणी जाणून घेतल्या –आ. बोंढारकर

**नांदेड (प्रतिनिधी)–** दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे राहणार असून, त्यांच्या समस्या शासनाच्या योग्य पातळीवर मांडून आवश्यक मदत व दिलासा मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही आमदार आनंदराव बोंढारकर यांनी दिली.

आ. बोंढारकर यांनी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील भायेगाव, राहेगाव, किकी, काकांडी, तुप्पा, हेमला तांडा, बाभूळगाव तसेच पुणेगाव, नागापूर, इंजेगाव, वडगाव, पिंपळगाव (मिश्री) आणि वांगी येथील शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन पिकांची पाहणी केली. यावेळी पावसाचे प्रमाण, जमिनीतील ओलावा,



पिकांची वाढ आणि पावसाअभावी पिकांवर झालेला परिणाम याचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला.

शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांनी पिकांची सद्यस्थिती, उत्पादनावर होणारा परिणाम, पाण्याची उपलब्धता तसेच शेतीसमोरील विविध अडचणी जाणून घेतल्या.

# एनटीसी उस्मानशाही मिल सुरु करण्यासाठी आज सर्वपक्षीय बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असलेली एनटीसी उस्मानशाही मिल पुन्हा सुरू करण्यासाठी रविवार, दि. २७ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

नांदेडची ऐतिहासिक उस्मानशाही मिल अनेक वर्षांपासून बंद असून, त्यामुळे स्थानिक रोजगार, कापूस उत्पादक शेतकरी, कामगार आणि वस्त्रोद्योगावर मोठा परिणाम झाला आहे. मिलचे पुनरुज्जीवन झाल्यास जिल्ह्यात रोजगारनिर्मिती, कापसाला बाजारपेठ व प्रक्रिया सुविधा आणि औद्योगिक विकासाला चालना मिळण्याची शक्यता आहे.

# कौठ्यात तरुणाचा खंजरने भोसकून खून; तिन्ही आरोपींना बेड्या

**नांदेड (प्रतिनिधी)–**शहरातील कौठा येथे जुन्या वैमनस्यातून आणि अनैतिक संबंधाच्या संशयातून एका ३५ वर्षीय तरुणाचा धारदार खंजीरने वार करून खून करणाऱ्या तिन्ही आरोपींना नांदेड ग्रामीण पोलिसांनी अवघ्या काही तासांत अटक केली आहे.

जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यांतील पाहिजे व फरारी आरोपींचा शोध घेण्याबाबत पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशान्वये विशेष शोध मोहीम राबविण्यात येत आहे.

दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री पावणे दहा वाजेच्या सुमारास नरेश बालाजी पवार (वय ३५, व्यवसाय - पिकअप चालक, रा. भाग्यश्री सोसायटी, वसरणी, नांदेड) हा जुना कौठा येथे मित्रांना भेटण्यासाठी गेला होता. बसवेश्वरनगर भागातील चक्कीजवळ आरोपींनी त्याला गाठले. जुन्या घटनेचा राग मनात धरून आरोपी राधेश्याम उर्फ लिंब्या प्रल्हाद गोंदवड, त्याचा चुलत भाऊ गजानन गोंदवड आणि रामेश्वर गोंदवड यांनी पूर्वनियोजित कट रचून नरेशच्या छातीवर, बरगडीत व हातावर धारदार खंजीरने वार करून घटनास्थळावरून पळ काढला.

# महावितरणच्या वीजवाहिनीतील शॉर्टसर्किटने ऊस जळून खाक



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यातील पिंपळगाव कु. शिवारात महावितरणच्या वीजवाहिनीमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने दोन शेतकऱ्यांच्या शेतातील संपूर्ण ऊस जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. या आगीत शेतकऱ्यांचे १०० टक्के नुकसान झाले असून, शेतकऱ्यांना दुष्काळात १० लाखांच्या वर आर्थिक फटका बसला. महावितरणच्या विद्युत वाहिनीमुळे आग लागल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीची तातडीने पंचनामा करून महावितरणने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

पिंपळगाव कु. येथील शेतकरी दत्तात्रय संभाजी साखरे यांच्या गट क्रमांक ५०४ मधील १.३० हेक्टर क्षेत्रातील ऊस आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. त्याच गट क्रमांकातील शेतकरी बाबाराव गंगाराम साखरे यांच्या १.२० हेक्टर क्षेत्रातील ऊसदेखील आगीत पूर्णपणे जळून खाक झाला आहे. अशा प्रकारे दोन्ही शेतकऱ्यांचे मिळून तब्बल २.५० हेक्टर क्षेत्रातील ऊसाचे १०० टक्के नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सदरील शेतातून गेलेल्या महावितरणच्या वीजवाहिनीमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने ऊसाच्या शेताला आग लागली. उसाचे पीक तयार होण्याच्या अवस्थेत असताना संपूर्ण पीक डोळ्यादेखत जळून गेल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. वर्षभर मेहनत, मशागत, खत-बियाणे, औषधोपचार आणि पाण्यासाठी केलेला खर्च आगीत भस्मसात झाला आहे.



**नांदेड –** माजी आमदार कै. प्रकाश खेडकर यांच्या ३३ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या दिग्विजय निवासस्थानी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी माजी आ. अनुसया खेडकर, महेश खेडकर, बंडू खेडकर, धोंडू पाटील, बबन बारसे, प्रकाश मारावार, सुनील कदम, विजय बगाटे, जिंतूसिंघ टाक, मनोहर लोलगे, सचिन पाटील, सौरभ देवकते, भरत देवडे, आनंदा नादरे, पुरभाजी जाधव आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

# नांदेड अधिवक्ता संघाकडून १ हजारांहून अधिक वकिलांचा अपघाती विमा

**नांदेड (प्रतिनिधी)–** न्यायव्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ असलेल्या अधिवक्त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने नांदेड अधिवक्ता संघाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आजपर्यंत नांदेडच्या अधिवक्ता संघाच्या माध्यमातून अधिवक्त्यांसाठी अशा स्वरूपाचे व्यापक अपघात विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यात आले नव्हते. मात्र विद्यमान अध्यक्ष ॲड. यदुपत अर्धापूरकर यांच्या नेतृत्वाखाली प्रथमच ७० वर्षांपर्यंतच्या सर्व पात्र अधिवक्त्यांचा अपघात विमा काढून देण्यात आला असून, त्याचा लाभ एक हजारांहून अधिक अधिवक्त्यांना मिळाला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात नांदेडच्या अधिवक्ता संघाने हा उपक्रम प्रथम राबविल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या विमा योजनेअंतर्गत प्रत्येक विमाधारक अधिवक्त्याला ५ लाख रुपयांचे अपघात विमा संरक्षण मिळाले आहे. कोणत्याही स्वरूपाचा अपघात झाल्यास विमा अटींनुसार ५० ते ६० टक्के अपंगत्वाच्या जोखमीसाठीही संरक्षण उपलब्ध होणार आहे.

विशेष म्हणजे आयकर भरलेल्या विमाधारक अधि-वक्त्यांना या योजनेत आणखी दोन लाख रुपयांचा अतिरिक्त लाभ मिळण्याची तरतूद असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे विमा संरक्षणाची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता आहे.

ही योजना राबविण्यासाठी नांदेड अधिवक्ता संघाचे उपाध्यक्ष ॲड. संगमेश्वर देलमाडे, महिला उपाध्यक्ष ॲड दीपाली डोणगावकर, सचिव ॲड. कपिल पाटील गाडेगावकर, सहसचिव ॲड जगदीश हाके, महिला सहसचिव ॲड. सुजाता बगाटे, कोषाध्यक्ष ॲड. मंगेश जामनिक, सर्व सदस्य ॲड. प्रदीप राठोड, मुक्ताई पवार, बाबू गावंडे, उज्ज्वला ढगे, रामसिंघ मठवाले, रीना पुंडगे, प्रीती हटकर, कार्तिक बोकारे, सुमेध येरेकार, उदय बडगे, राजू हटकर, गंगासागर सोलगे पाटील, संकेत राठोड, जावेदखान युसूफखान पठाण यांनी पुढाकार घेतला. तसेच उपाध्यक्ष ॲड. संगमेश्वर देलमाडे यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

अधिवक्ता संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केवळ घोषणा न करता अधिवक्त्यांच्या प्रत्यक्ष हितासाठी सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या दिशेने पुढाकार घेतल्याचे चित्र आहे. अधिवक्त्यांच्या व्यावसायिक प्रश्नांबरोबरच त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेचा विचार करणारे उपक्रम राबविणे, ही संघाच्या कार्याची वेगळी दिशा ठरत आहे. त्यामुळे या उपक्रमांकडे नांदेडच्या विधिज्ञ क्षेत्रात सकारात्मक आणि आश्वासक पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

# भक्तीमय वातावरणात गणरायाचे विसर्जन, सेवा उपक्रमांनी जपला सामाजिक एकोपा

**नांदेड (प्रतिनिधी)–** गणरायाच्या निरोपासाठी निघालेल्या विसर्जन मिरवणुकांमध्ये ढोल-ताशा पथके, विविध बँड पथके, भजनी मंडळी आणि पारंपरिक वाद्यांचा निनाद पाहायला मिळाला. ढोल-ताशांच्या कडकडाटात तरुणाईचा उत्साह आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषामुळे शहरातील वातावरणात चैतन्य निर्माण झाले होते. अनेक गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला रात्री उशिरापर्यंत भावपूर्ण निरोप दिला. यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



विसर्जन मिरवणूक मार्गावर विविध गणेश मंडळे, सामाजिक संस्था आणि नागरिकांकडून भाविकांसाठी सेवा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ठिकठिकाणी प्रसाद, शरबत आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात आल. तसेच पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था करण्यात आली होती. मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाल्याने स्वयंसेवकांकडून त्यांच्या सुविधेची विशेष काळजी घेतली जात होती.

नांदेड शहरातील प्रमुख मार्गांवरून गणेश विसर्जन मिरवणुका मोठ्या उत्साहात मार्गक्रमण करत होत्या. विविध मंडळांनी आकर्षक सजावट आणि रोषणाई करत वाद्यांच्या गजरात बाप्पाला निरोप दिला. या सोहळ्यात लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील नागरिक सहभागी झाले होते. विशेषतः महिला आणि युवतींच्या ढोल-ताशा पथकांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

सार्वजनिक गणेश मंडळांसह घरगुती गणेशोत्सवातही विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. गणरायाला निरोप देताना भक्तांच्या चेहऱ्यावर उत्साह असला तरी भावनिक वातावरणही होते. अनेकांनी पुढील वर्षी लवकर येण्याचे साकडे बाप्पाला घातले. तर काही गणेश भक्तांना येळेगाव आणि किवळा या ठिकाणी आपल्या बाप्पाला निरोप द्यावा लागला.

दरम्यान, विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर नांदेड पोलिसांकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या सुक्ष्म मार्गदर्शनाखाली संवेदनशील ठिकाणी आणि मिरवणूक मार्गावर विशेष लक्ष ठेवण्यात आले होते. वाहतूक सुरळीत राहावी आणि मिरवणुका शांततेत पार पडाव्यात यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज होती. विशेष म्हणजे सकाळपासून ते रात्री शेवटच्या गणेश विसर्जनापर्यंत स्वतः पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहण व त्यांचे अधिनस्त अधिकारी रस्त्यावर होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com